पुणे, किशोर–वर्ष ५४, अंक ८ वा, ऑगस्ट २०२५ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.54, Issue 8, August, 2025 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

ऑगस्ट २०२५



# निपुण भारत

**शेख वसीम हमीद**

भारत होईल निपुण, माझा भारत होईल निपुण
चला गाऊया साक्षरतेचा झेंडा उंच धरून..

कास धरूनी विज्ञानाची
तोडू साखळी अज्ञानाची
कलाम, रमण बनूनी सारे
चढू शिखरे अभिमानाची
चला जाऊया चंद्रावरती यानामधूनी बसून...

पाढे आमच्या ओठांवरती
गणित सोडवू बोटांवरती
नफा काढूनी आपण सारा
लगाम ठेवू तोट्यावरती
नवविश्व निर्माण करू आर्यांच्या शून्यामधून...

घालूनी ती वर्णांची माला
स्वर-व्यंजनांचा पिऊनी प्याला
ध्येयासाठी ध्यास धरूनी
ज्ञानाचा अभिषेक हो झाला
कौशल्यांचे अमृत चाखू मातृभाषेमधून ...

संपर्क : ९९६०९९६२२२



# किशोर

ऑगस्ट २०२५, वर्ष ५४ वे, अंक ८ वा,
श्रावण-भाद्रपद, शके १९४७

- **संपादक :**
अनुराधा ओक, प्र. संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

- **प्रकाशक :**
हेमंत बाबर
प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

- **कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

- **निर्मिती अधिकारी :**
मनिष निघोट

- **वितरण व्यवस्थापक :**
जी. आर. पानसरे

- **मुखपृष्ठ :** राजेश भीमराज सावंत
संपर्क : ९९६०९९६२२२

- **चित्रांकन :**
घनश्याम देशमुख, रेश्मा बर्वे, राजेंद्र गिरधारी,
अजय विभुते, योगिता धोटे, लोकेश कुलकर्णी,
राहुल पोतदार, विनोद गायकवाड,
माईंडईट संवाद

- **अक्षरजुळणी :** किशोर विभाग

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

- **ऑनलाईन वर्गणीकरिता :**
www.kishor.ebalbharati.in



**पत्रव्यवहाराचा पत्ता:**
**कार्यकारी संपादक, किशोर,**
**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती**
**व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४
संपादकीय : ०२०- २५७१६१०७
वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in


# अंतरंग


०२ निपुण भारत — शेख वसीम हमीद
०६ श्रावण सहल — प्रा. देवबा पाटील
०९ श्रावण — अनिकेत देशमुख
१० स्वतंत्र भारतात राहताना — उज्ज्वला पांडे
१२ गुहेत दडलेले रहस्य — सुहास बारटक्के
१५ नदी — सचिन शिंदे
१६ खरा आनंद — समाधान पुजारी
१९ चला चित्र रंगवूया — रेश्मा बर्वे
२० AI आणि निवडणूक — अच्युत गोडबोले


**अभिजात मराठी विभाग**


२२ सोनेरी श्रावणात झगमगणारे — प्रवीण दवणे
२४ शब्दांची उकल — डॉ. नीलिमा गुंडी
२६ गंमत शब्दांची — प्रा.विश्वास वसेकर
२७ प्रश्नमंजुषा — उदय कदम
२८ चिमुरडीचे देशप्रेम — आबा महाजन
३३ जय जवान जय किसान — प्रकाश सपकाळे
३५ परी गं परी — मुबारक शेख
३६ पिंपळपार व्याख्यानमाला — रत्नाकर धर्माधिकारी
३८ कुतूहल — वसुंधरा भोपळे


**बालविभाग**


४० भावी आधारस्तंभ
४२ उमलती प्रतिभा
४४ चित्रकथा : जादूगाराची सुटका — घनश्याम देशमुख
४६ फुलपाखरांची शाळा — स्वप्नील जळगावकर


**English Section**


४७ The Heavenly Gift — Sadanand Pundpal
४८ The Treasure Hunt — Aaradhya Nandkar
५० Puzzle

# प्रिय किशोर

मी इयत्ता ८ वी मध्ये आहे. आमच्या नवभारत सार्वजनिक वाचनालयात 'किशोर' मासिक वाचायला मिळते. ते मी नित्यनियमाने वाचतो. त्यात उमलती प्रतिभा, या सदरात मी माझ्या मनाने लिहिलेल्या कविता पाठवल्या होता. तेव्हापासून मला कविता लिहिण्याचा छंद लागला. आतापर्यंत मी ५६ कविता लिहिल्या असून त्या पुस्तकरूपाने प्रकाशित करणार आहे. 'किशोर' मासिकामुळे मला ही प्रेरणा मिळाली.

**हरि रामप्रसाद चौरे**
इयत्ता ८ वी क, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर केज,
शारदा गुरुकुल केज, भवानी माळ, केज- ४३११२३.

'किशोर'चा प्रत्येक अंक एक नवीन जोश घेऊन येतो. महिन्याची उत्सुकता अखेरीस एका दिवसाला संपते आणि मग पुन्हा वाट बघायची असते ती पुढच्या अंकाची. त्यातल्या गोष्टी व कविता फार आकर्षक असतात. कुतूहल, चित्रकोडे व फनी पझल, अक्षरशः डोके खाजवायला लावतात. एकच विनंती ती अशी, की आम्हांस फनी पझलचीही उत्तरे द्यावी. ज्यामुळे आम्ही आमची बुद्धीची झेप जाणू शकू. पुढील अंकाची वाट बघत आहे.

तुमचा नियमित वाचक

**सार्थक सरवाडे**
इयत्ता ५ वी, लॉर्ड गणेशा इंग्लिश स्कूल, जामनेर ४२४२०६.



हितगुज

# वीरबाला कनकलता

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लहान-मोठे अशा या सर्वांनीच बलिदान केले, त्याग केला आहे. या प्रत्येकाच्या कथा खरोखरच प्रेरणादायक आहेत. भारतीय स्वातंत्र्ययुद्ध चिरडून टाकण्यास इंग्रजांनी साम-दाम-दंड-भेद, भले-बुरे, फोडा-झोडा असे सर्वच उपाय अमलात आणले. जनतेवर खूप अन्याय, अत्याचार केले, हिंसा केली. अमानुष अत्याचार, शिक्षा करून भारतीय जनतेमध्ये भयंकर घबराट, दहशत निर्माण केली. पण तरीही या सर्वच अन्यायाला हसत हसत निडरपणे सामोरे जात अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी, क्रांतिकारकांनी इंग्रज सरकारला सळो की पळो करून सोडले. या धाडसात अनेक बालकिशोर व कुमार वयाच्या मुलामुलींचाही समावेश होता. त्यातील एक, शूर, धाडसी तेजशलाका म्हणजे आसाममधील कुमारी कनकलता बारुआ; जिला ईशान्य भारतातील 'लक्ष्मीबाई' म्हणूनही ओळखले जाते. वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी कनकलताने केलेल्या पराक्रमामुळे अनेकांना स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा मिळाली. तिची गोष्ट आज मी तुम्हांला सांगत आहे.

कनकलताचा जन्म आसामच्या दरंग जिल्ह्यातील बारंगाबारी गावात झाला. आई-वडलांचे अकाली निधन झाल्याने तिच्या लहान भावंडांची काळजी घेण्यासाठी तिला शाळा सोडावी लागली. लहानवयातच तिला किती त्याग करावा लागला, तडजोड करावी लागली असेल याची तुम्ही कल्पना करून पहा.. आजी आणि काका-काकूच्या सहवासात कनकलता मोठी होत होती. घरकाम, भावंडांचा सांभाळ यात तिचा दिवस निघून जायचा. आता ती १७ वर्षांची झाली. कुशल कोंवर यांच्यासारख्या आसामी स्वातंत्र्यसैनिकांच्या कथांपासून तिला देशप्रेमाची प्रेरणा मिळाली होती. म्हणूनच तिला देशाच्या स्वातंत्र्यासाठी नेताजींच्या आझाद हिंद फौजेत सामील व्हायचे होते, पण तेव्हा ती अल्पवयीन असल्याने तिला फौजेत सामील होता आले नाही. पण देशाच्या स्वातंत्र्यासाठी कार्य करायची तिची जिद्द मोठी होती. तिने क्रांतिकारी कार्यात सहभागी व्हायचे ठरवले. ती तिच्या गावात सक्रिय असलेल्या विविध विद्यार्थी संघटनांच्या गुप्त बैठकांना उपस्थित राहायला लागली. त्या काळात आसाम राज्यात अनेक महिला अहिंसावादी संघटना 'शांती वाहिनी' आणि क्रांतिकारी संघटना 'मृत्यू वाहिनी' मध्ये सामील होत होत्या. क्रांतिकारी मृत्यू वाहिनीमध्ये सामील होण्यास अल्पवयीन मुलांना परवानगी दिली जात नसे. पण कनकलताने मोठ्या प्रयत्नांनी त्यात प्रवेश मिळवला. तिचे पालक तिचे लग्न करण्यास उत्सुक होते. पण तिला तिच्या लग्नापेक्षा, भारताचे स्वातंत्र्य जास्त महत्त्वाचे वाटत होते. याच वेळी भारत छोडो आंदोलन सुरू झाले होते. कनकलताने या लढ्यात उडी घेतली. एका गुप्त बैठकीत २० सप्टेंबर १९४२ रोजी तेजपूरपासून ८२ मैल अंतरावर असलेल्या गोहपूर पोलिस ठाण्यात 'भारत छोडो' आंदोलनाच्या समर्थनार्थ तिरंगा फडकवण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व कनकलताने करायचे ठरवले. त्यानुसार तिने पोलीस स्टेशनसमोर झेंडावंदन करण्यासाठी युवक युवतींचा एक गट तयार केला. ठरलेल्या दिवशी सकाळी लवकर सर्व घरकाम आटोपून ती मोर्चा घेऊन निघाली. पोलीस अधिकाऱ्यांनी कनकलता आणि सहकाऱ्यांना अडवले. त्यांनी सर्वांना 'पुढे जाऊ नये अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील' असा इशारा दिला. त्या वेळी पोलिस स्टेशन समोर जमलेल्या सर्व जनतेसमोर समोर कनकलताने उत्स्फूर्त, प्रेरक भाषण केले. 'वंदे मातरम्'च्या घोषणा आकाशाला भिडल्या. शंख, ढोल, बासरी आणि पितळी शंख यांसारख्या वाद्यांच्या आवाजाने वातावरण भारले गेले. कनकलता तिरंगा फडकवण्यासाठी निघाली. त्याच वेळी पोलिसांनी गोळ्यांचा वर्षाव केला. कनकलताला पहिली गोळी लागली. गोळी लागल्यानंतर कनकलता खाली पडली, पण तिच्या हातातला तिरंगा तिने खाली पडू दिला नाही. तिचे धाडस आणि बलिदान पाहून इतर मुलांमध्ये वीरश्री संचारली. ते कनकलताच्या हातातून तिरंगा घेऊन पुढे जात राहिले. ते एकामागून एक पडत राहिले, पण त्यांनी ध्वज पडू दिला नाही. शेवटी रामपती राजखोवा यांनी पोलिस स्टेशनवर ध्वज फडकावला.या घटनेनंतर आसाममधील भारत छोडो आंदोलन अतिशय तीव्र झाले. 'कनकलता' हे नाव आजही आसाममध्ये अत्याचार आणि अन्यायाविरुद्धच्या क्रांतीचे प्रतीक आहे. आजही आसामच्या सामाजिक-राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात तिची स्मृती जिवंत आहे. भारतभूमीवर हुतात्मा होण्याचा भारतीय युवतींत पहिला मान कनकलताला मिळून ती अमर झाली.

किरण केंद्रे
कार्यकारी संपादक





# श्रावण सहल

**प्रा. देवबा पाटील**

एखाद्या सुटीच्या दिवशी जवळच असलेल्या निसर्गरम्य व ऐतिहासिक शिवपूरला सहल काढायची असा सिद्धांत व त्याचे मित्रमंडळ ह्या बालसेनेचा बेत ठरला. श्रावण महिना सुरू झाला होता. त्यामुळे दर श्रावणी सोमवारी तिथे छोटीशी जत्राही भरायची व मुलांना दुपारी शाळेला सुटी असायची. जत्रा म्हटले म्हणजे मुलांसाठी तर एक आनंदाची पर्वणीच असायची. योगायोगाने सोमवारी १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन आल्याने व त्या दिवशी शाळेतील कार्यक्रम सकाळी लवकरच आटोपल्यानंतर दिवसभर सुटी मिळणार असल्याने; सर्वानुमते येणारा सोमवार हाच सहलीचा दिवस ठरवण्यात आला.

साऱ्या मुलांनी सहलीसाठी आपापल्या आईवडलांना विचारले. त्यांना सहलीचे महत्त्व माहीत होते. सहलीमुळे मुलांना आनंद मिळतो, ज्ञानप्राप्ती होते, त्यांच्यात सहकार्याची, ऐक्याची भावना वाढते, ते निर्भय व धाडसी होतात हे ते जाणून होते. तसेही शिवपूर त्यांच्या गावापासून एस.टी. बसच्या पंधरावीस मिनिटांच्या अंतरावर होते. आणि आता मुलेही थोडीफार समजदार झाली होती. त्यामुळे त्यांनी आनंदाने आपल्या मुलांना सहलीला जायची परवानगी दिली. मग काय मुलांच्या आनंदाला पारावार राहिला नाही.



घरच्यांनी सहलीला परवानगी दिल्याने साऱ्या मुलांचा आनंद गगनात मावत नव्हता. सगळी मुले सहलीच्या तयारीला लागली. सोमवार उजाडण्याची ती सारी आतुरतेने वाट बघू लागली. सहलीसाठी सोबत काय काय घ्यायचे ह्याची प्रत्येकाने एकमेकांसोबत व आपल्या आईवडलांसोबत, ताईदादांसोबत चर्चा करून आपापल्या परीने आदल्या दिवशीच जय्यत तयारी करून ठेवली.

१५ ऑगस्ट या दिवशी सकाळी सारी मुले झोपेतून लवकर उठली. आपला शाळेचा स्वच्छ गणवेष घालून शाळेत गेली. शाळेत सर्व मुलेमुली, शिक्षक-शिक्षिका जमा झाले होते. मुख्याध्यापकांच्या सूचनेनुसार शारीरिक शिक्षणाच्या सरांनी साऱ्या कार्यक्रमाची सुरेख अशी रचना तयार केली. शाळेतून सर्वप्रथम प्रभातफेरी निघाली. प्रभातफेरी गावामध्ये मुख्य रस्त्याने फिरू लागली. प्रभातफेरीमध्ये सिद्धांत हा त्याच्या बालवीर पथकाचा संघनायक असल्याने हातात तिरंगी झेंडा घेऊन सर्वांच्या पुढे होता. 'जय हिंद जय भारत', 'आपले स्वातंत्र्य-चिरायू होवो', 'जय भारत-जय हिंदुस्थान भारतवासी वीर महान, 'देशासाठी-देऊ प्राण' अशा मोठमोठ्याने गर्जना देत सारी मुलेमुली रस्त्याने आपापल्या रांगेत शिस्तीत चालत होते. त्यांच्या बाजूने शिक्षक व शिक्षिका चालत होते. साऱ्यांच्या आनंदाला उधाण आले होते.

गावातील प्रभातफेरी संपल्यानंतर शाळेत विविध कार्यक्रम सुरू झाले. त्या कार्यक्रमांमध्ये ज्याने त्याने आपापल्या क्षमतेनुसार व आवडीप्रमाणे भाग घेतला. सिद्धांतने भाषणात भाग घेतला होता. त्यानंतर अनंतने एक वीरश्रीयुक्त पोवाडा म्हटला. विक्रांत व श्रीकांत ह्या दोघांनी एक देशभक्तीपर गीत सादर केले. शेवटी शाळेतील समारंभ संपला. साऱ्यांनी मिळालेल्या साखर-खोबऱ्याच्या गोड प्रसादाचा आस्वाद घेतला आणि ही कुमारमंडळी लगबगीने घरी आली. तोपर्यंत प्रत्येकाच्या घरी त्यांच्यासाठी नाश्ता व जेवणाचे डबे तयार करून ठेवले होते.

प्रत्येकाने आपापल्या घरी गेल्याबरोबर आईने दिलेला नाश्ता केला. आपल्या बॅग्ज व डबे घेतले नि आधी ठरल्याप्रमाणे बसस्टँडवर जमा झाले. थोड्याच वेळात शिवपूरला जाणारी बस आली. बसमध्ये सगळे प्रवासी भोलेनाथ महादेवाचे भक्त असल्याने 'हर हर महादेव'च्या गर्जनेनंतर बस सुरू झाली. अधूनमधून कोणी 'जय शिवशंकर', कुणी 'बम बम भोले' तर कोणी 'जय जय भोलेनाथ' चा गजर करीत होते, हा गजर ऐकून बालसेनेला एक वेगळाच आनंद होत होता. तेसुद्धा उत्स्फूर्तपणे त्या गर्जनांमध्ये सामील झाले व गर्दीचा त्रास विसरून गेले.

पंधरा-वीस मिनिटांतच त्यांची बस शिवपूरला पोहोचली. सारी मंडळी पटापट बसमधून खाली उतरली. ही मुले तर जणू काही उड्या मारतच रस्त्याने चालू लागली. शिवपुरात जिकडेतिकडे शिवभक्तांची गर्दी होती. त्यांच्यासोबत आपल्या बालसेनेने प्रथम वेदपुरातील मंदिरे बघून घेतली. नंतर ते टेकडीवरील शिवमंदिराकडे निघाले. रमतगमत, गप्पाटप्पा करत, हसतखिदळत, निसर्गसौंदर्य न्याहाळत, कवितांच्या भेंड्या खेळत ते शिवमंदिराजवळ पोहोचले. त्यामुळे टेकडीची अवघड चढण काही त्यांना जाणवली नाही. त्यांनी देवदर्शन घेतले.

एव्हाना दुपार झालीच होती. वेदपुरात वेगवेगळी मंदिरे बघताना व शिवमंदिराची टेकडी चढून सारी मुले थकली होती. साऱ्यांना सपाटून भुका लागल्या होत्या. ते मंदिराच्या प्रशस्त आवारात एका लिंबाच्या दाट सावलीत बसले. साऱ्यांनी गप्पाटप्पा करीत आपले भोजन आटोपले आणि तेथेच त्या घनगर्द गार सावलीत थोडा वेळ आराम करीत बसले.

ते श्रावण महिन्याचे दिवस असल्याने आभाळात वेगवेगळ्या आकारांचे काळेपांढरे मेघ वाऱ्यासोबत धावत होते. जणू काही त्यांची स्पर्धा लागली आहे असे वाटत होते. खूपच नयनमनोहर दृश्य दिसत होते ते. वातावरण एकदम प्रफुल्लित होते. आराम करताकरता श्रीकांत त्या पर्वताच्या टेकड्यांकडे बघू लागला. त्या हिरव्यागार दिसणाऱ्या टेकड्या बघून त्याचे मन खूप आनंदले व त्याच्या मनात साहजिकच काही प्रश्न निर्माण झाले. तो म्हणाला, ''आपल्या पृथ्वीवर ह्या डोंगर-दऱ्या कशा काय निर्माण झाल्या असतील गड्या?''

''काय माहीत भोऽऽ'' प्रशांत उत्तरला.

''जाऊ दे रे. आपल्याला काय करायचे त्याचे?'' अनंत बोलला.

''नाही रे गड्या, असा कसा म्हणतो तू? माणसाला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान असणे आवश्यक आहे आणि

आपण तर अभ्यासू विद्यार्थी आहोत.'' विक्रांत बोलला.

''हो ना! आपणाला काही गोष्टी माहीत असणे गरजेचे आहे.'' जयंतने त्याला दुजोरा दिला.

''पण मग ही माहिती आपणास कशी मिळेल?'' अनंतने शंका काढली.

आतापर्यंत सिद्धांत गुपचूप बसून त्यांचे संभाषण ऐकत होता. तो म्हणाला, ''तुम्हांला हवी आहे का ही माहिती?''

''हो. तुला माहीत असेल तर सांग आम्हांला.'' बाकीचे एक सुरात म्हणाले.

त्याने आपल्या बॅगमधून 'जिज्ञासापूर्ती' हे विज्ञान विषयक पुस्तक बाहेर काढले व त्यातून माहिती वाचून आपल्या मित्रांना सांगू लागला, ''ही पृथ्वी थंड होत असताना तिचा काही भाग सारख्या प्रमाणात व समान कालावधीत थंड होत गेला तर काही भाग कमी तर काही भाग जास्त थंड होत गेला, काही आधी तर काही नंतर असा मागेपुढे गोठत गेला. त्यामुळे तिच्या पृष्ठभागावर काही ठिकाणी सुरकुत्या म्हणजे वळ्या पडल्या तर काही भाग सपाट झाला. सुरकुत्यांमधील काही उंचवटे गोठण प्रक्रिया सुरू असतानाच खूप उंच गेले व त्यांचे गोठल्यानंतर उंच व मोठमोठे डोंगर बनले. त्याच वेळी त्याच वळ्यांमधील काही उंचवट्यांच्या बाजूचे खोलवटे अतिशय खोल खोल गेले व गोठत गोठत त्यांच्या अति खोल दऱ्या तयार झाल्या. म्हणजेच पृथ्वीवरील सपाट पृष्ठभागापेक्षा उंच शिखर असलेल्या मोठ्या उंचवट्यास 'डोंगर' म्हणतात. दोन डोंगरांमधील उतरंडीच्या खोल भागास 'दरी' म्हणतात. तसेच पृथ्वी थंडावताना होत गेलेल्या भूकंपांनीही काही भागांचा उंच उभार झाला तर काही भाग अति खोल गेला. थंडावण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यांतर ते सारे कडक बनलेत. अशा रीतीने पृथ्वीवर डोंगरदऱ्या निर्माण झाल्या.''

''गड्या, ह्या डोंगरात हे मोठमोठे खडक-दगड कसे निर्माण झालेत?'' विक्रांतने प्रश्न केला.

सिद्धांत पुढे सांगू लागला, ''पृथ्वीच्या पृष्ठभागावरील माती-रेती साचून घट्ट बनलेल्या गोळ्यास 'खडक' म्हणतात. मातीरेतीच्या वेगवेगळ्या प्रकारांनुसार खडकही विविध प्रकारचे असतात. सुरुवातीला आपली पृथ्वीसुद्धा अत्यंत उष्ण असा वायूंचा गोळाच होती. खूप कालांतराने ती हळूहळू थंड होत गेली. बऱ्याच कालावधीनंतर तिच्याभोवती वातावरण तयार होत गेले. काही काळानंतर पडलेल्या पावसाने ती गोठत गेली व घन होत गेली. थंडावताना त्यावर पापुद्रा निर्माण झाला. तो हळूहळू कठीण, कडक होत गेला. पृथ्वीच्या कडक अशा बाह्य थरांनी बनलेल्या गोलाकार भागाला भूकवच म्हणतात. त्याचेच कुठे कठीण खडक बनले, कुठे नरम खडक तयार झाले तर कुठे प्रचंड कडक दगड, विशाल काळेशार पाषाण बनले.''

''आपल्या पृथ्वीवर डोंगर, पर्वत खूप आहेत परंतु सागर मात्र पाचच आहेत ना रे सिद्धांत?'' श्रीकांतने विचारले. खरे पाहिले तर पृथ्वीवर विशाल, अथांग व अफाट असा एकच महासागर आहे. इतर सारे समुद्र त्याचेच तुकडे आहेत. पृथ्वीवर ७० टक्के भाग सागरांनी व्यापला आहे आणि केवळ ३० टक्केच जमीन आहे. ही ३० टक्के जमीनही; सपाट जमीन व डोंगरपर्वत, पठारे ह्यांमध्ये विभागली आहे. वैज्ञानिकांनी महासागरांचे पाच भाग पाडले असून ते अटलांटिक, पॅसिफिक, इंडियन, ऑर्क्टिक, व अंटार्टिक्ट हे आहेत.'' सिद्धांतने सांगितले.

''चला आता बराच वेळ झाला आपल्याला येथे विश्रांतीसाठी थांबून! आता आपण परत निघायला हवे.'' प्रशांतने उठून उभे राहत सुचवले. ''हो. चला तर आता आपण खाली उतरू या.'' सिद्धांतनेही उठून उभे राहत प्रशांतच्या बोलण्याला संमती दिली.

सारे उठून आवरू लागले आणि हळूहळू शिवमंदिराची टेकडी उतरू लागले. चालता चालता ''तुला कसे माहीत रे की आम्ही तुला प्रश्न विचारणार म्हणून तू पुस्तक सोबत आणलेस?'' जयंतने विचारले.

''अरे, मला नेहमी वाचनाची आवड आहे हे तुम्हां सगळ्यांना तर ठाऊकच आहे. जे मी वाचतो त्यातील अभ्यासोपयोगी बाबी मी लिहूनही ठेवतो. प्रवासात कंटाळा आल्यास सोबत करमणुकीसाठी वाचनास काहीतरी हवे म्हणून आधीच मी हे पुस्तक बॅगमध्ये ठेवले होते.'' सिद्धांतने सांगितले. थोड्याच वेळात ते सारे शिवपूरच्या बसस्टँडवर पोहचले. परतीच्या बसने आपल्या गावाकडे परत निघाले.

**संपर्क : ९४२०७९५३०७**



# श्रावण

शं.ल.नाईक

उत्साहाची उधळण करीत
फिरू लागला वारा,
क्षणात कोवळे ऊन पिवळे
क्षणात रिमझिम धारा
          नभोमंडपी दिसू लागली
          इंद्रधनूची कमान,
          जिकडे तिकडे रानी वनी
          हिरवं हिरवं रान
निळ्या अंबरी घेऊन भरारी
उडू लागले पक्षी,
जागोजागी हिरव्या रानी
रानफुलांची नक्षी
          धो धो धो धो धबधब्याचं
          पाणी लागलं हसू,
          तळ्याकाठच्या जंगलामध्ये
          हरणं लागली दिसू
खळखळ खळखळ ओढे वारे
गाऊ लागले गान,
हिरवा शालू नेसून धरती
नटून बसली छान!

संपर्क : ९९२१२४१०२१

# स्वतंत्र भारतात राहताना




उज्ज्वला देशपांडे

१५ ऑगस्टला तुम्ही सगळे शाळेत झेंडावंदनाला जाता. भारत देशाचा तिरंगी झेंडा, त्याच्या प्रति आदर भावना प्रदर्शित करायचा, त्याला वंदन करायचा हा औपचारिक दिवस. ही आदराची भावना, प्रत्यक्ष कृती सर्व दिवसांसाठी असायला हवी.

वसाहतवादातून, इंग्लंडपासून आपली मुक्तता, त्यापासून मिळालेलं स्वातंत्र्य अमूल्य आहे.

अशा स्वतंत्र भारतात तुम्ही सगळे शिकत आहात, मोठं होण्यासाठी! ज्यांनी आपल्याला हे स्वातंत्र्य मिळवून दिलं त्यांच्याप्रमाणे असं मोठं होण्यासाठी आपण स्वतंत्र असणे फार महत्त्वाचं असतं. मग स्वतंत्र भारतात राहायचं म्हणजे काय करायचं?

पुढे वाचायच्या आधी तुम्हांला या प्रश्नाचे उत्तर द्यायचंय! घ्या वही-पेन आणि काढा लिहून 'स्वतंत्र भारतात राहायचं म्हणजे काय करायचं?' कमीत कमी पाच मुद्दे तरी लिहा आणि हो कोणालाही विचारायचं नाही की गुगलही करायचं नाही. तरच पुढची मजा समजेल. लिहून झालं की ठेवा तो कागद बाजूला आणि घ्या हा लेख परत वाचायला.

मीपण तुमच्यासारखी शिकत असताना खूप वाचन करायचे, अजूनही करते. त्या वेळेस एका पुस्तकाचा काही भाग मला अभ्यासालाच होता 'द स्टोरी ऑफ सिव्हिलायझेशन' म्हणजे आपण त्याला 'सभ्यतेची गोष्ट' म्हणूया. लेखक सी.ई.एम. जोड (C.E.M. Joad). तुम्ही थोडे मोठे झालात ना, म्हणजे महाविद्यालयात गेल्यावर, तेव्हा हे पुस्तक नक्की पूर्ण वाचून काढा. खूप छान आहे.

या पुस्तकातल्या काही मुद्द्यांना घेऊन आपण आपल्या प्रश्नांचे उत्तर समजून घेऊ. हा लेख वाचून झाला की परत एकदा तुमचा आधीचे उत्तर असलेला कागद समोर धरा. बघा बरं काय-काय फरक दिसतोय?

परंतु आधी हे तर बघूया की ते पुस्तक काय सांगतंय?

आपल्याला आपल्या देशाचा अभिमान आहे. माझ्या जपान देशाच्या ट्रिपमध्ये मी प्रखर राष्ट्रप्रेमी जपानी माणसं बघितली. महाविद्यालयात शिकणारा गाईड मुलगा मला म्हणाला, ''आमच्या देशातून तुम्ही परत जाताना आमच्या देशाबद्दल फक्त सकारात्मकच अनुभव घेऊन

जाल ही जबाबदारी आम्हां सगळ्या सर्वसामान्य जपानी लोकांची आहे, फक्त सरकारची नाही.''

आणि खरंच आपण परत आलो की जपानचे गोडवे गाणं थांबत नाही, काय स्वच्छता! काय वेळेवर सगळं होतं! किती आदराने एकमेकांशी वागलं जातं! किती टापटीप आणि सुंदर आहे सगळं! सगळ्यात सुरक्षित आहे! किती प्रामाणिकपणा आहे सगळ्यांमध्ये! केवढी शिस्त! इत्यादी, इत्यादी.

आपण जेव्हा आपल्या देशाचा अभिमान म्हणतो तेव्हा आपलापण शूरांचा इतिहास, वैविध्यपूर्ण भूगोल, छान-छान खाद्यपदार्थ, आपलं चांद्रयान, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (IT) इत्यादींबद्दल अभिमानाने बोलतो. परंतु आपल्याला माहीत आहे ना की अजून रोजच्या शाळेच्या गडबडीत आपल्याला कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी शिकायच्या आहेत? करायच्या आहेत ते?

आता दुसरा कागद घ्या. आपल्यालाही जपानच्या लोकांसारखं 'आपला देश फिरायला आलेल्यांना परत जाताना सकारात्मकच अनुभव घ्यायचे असतील तर आपण काय-काय बदल केले पाहिजेत?' काढा बघू लिहून.

झालं? आता पुढे.

इतक्यात तुम्ही वाचलंत का कुठेतरी लांब-लांब अवकाशात (त्या ग्रहाला K2-18b असं नाव दिलं आहे) शास्त्रज्ञांना जीवसृष्टी असण्याची शक्यता वाटते? थोडे पुरावे मिळालेत, अजून अभ्यास, संशोधन चालू आहे.

कित्ती धमाल येईल ना अशा संशोधनातून आपल्याला खरंच परग्रहावरचे सजीव समजले तर! 'कोई मिल गया' मधल्या 'जादू' सारखा असेल का हा परग्रहावरचा सजीव? का स्टार-ट्रेक मालिकेतल्या काही व्यक्तीरेखांसारखा असेल?

अरे पण हे शास्त्रज्ञ असा शोध कसा लावतात?

ते नवीन नवीन विचार करतात. आपलं जग, आपल्या जगाबाहेरचं जग कसं असेल? त्याचे कुतूहल त्यांना आणखी नवीन शोध लावायला प्रोत्साहन देतं.

अशा नवीन गोष्टींचा विचार स्वातंत्र्यात शक्य होतो. आपल्या देशाच्या आजूबाजूला काही युद्धग्रस्त देश आहेत. तुम्ही टीव्हीवर बघत असाल त्या देशांमध्ये तुमच्यासारखीच मुलं-मुली अन्न-पाण्यासाठी मोठ्यांमागे धडपडत असतात. युद्धामुळे त्यांची घरं, शाळा सगळं उध्वस्त झालेलं असतं. त्यांना नवीन विचार करणं शक्यच नसतं.

आता तिसरा कागद घ्या. तुम्हांला 'कशाबद्दल नवीन विचार करायला आवडेल?' त्यातून शोध लागलेच पाहिजेत असं नाही, लागले तर मस्तच!

बाल विचारवंतांनो, बाल शास्त्रज्ञांनो थोडं आपण तुमच्या पालकांनापण आपल्या या 'कागद-लिखाण' ॲक्टिव्हिटीत सहभागी करून घेऊया. सांगा बरं तुम्ही त्यांना 'त्यांची कामं, टीव्ही मालिका, मोबाईल' बाजूला ठेवायला.

मला तर हा लेख लिहिताना असं वाटतंय की मी तुमच्यासमोर बसून, तुमच्या बरोबरीने हा लेख वाचला पाहिजे. तुमच्यासारखं कागद-लिखाण केलं पाहिजे. परंतु ते तर जरा अवघडच आहे, म्हणून आई-बाबांना घ्या तुमच्याबरोबर.

'आता तुम्हांला चौथ्या कागदावर जे लिहायचं आहे ते अगदी मोकळेपणाने, कोणालाही न घाबरता लिहायचंय, काय? आणि मग तो कागद आई बाबांना पण दाखवायचा आहे. अरेच्चा, त्यावर काय लिहायचे पण? ते तर सांगायचं राहूनच गेलं! सांगते, सांगते...'

या चौथ्या कागदावर तुम्हांला कशाची भीती वाटते याचे पाच मुद्दे आणि तुम्हांला कशाचा राग येतो याचे पाच मुद्दे लिहायचे आहेत.

आता हा कागद आई-बाबांना नक्की दाखवायचा आणि त्यांच्या मदतीने आपल्याला वाटणारी भीती, आपल्याला येणारा राग यावर मात करायची. हॅरी पॉटर बघितला किंवा वाचला असेल ना? त्यातले हॅरी आणि त्याचे मित्र मैत्रिणी जसे भीतीवर/रागावर मात करतात तसेच.

नंतर आपण लिहिलेला पहिला कागद बघायचा, स्वतंत्र भारतात राहायचं म्हणजे काय करायचं या प्रश्नावर आपण जी उत्तरं लिहिलेली आहेत त्यात जर काही नवीन मुद्दे टाकायचे असतील तर नक्की टाका. आधीचे लिहिलेले मुद्देपण असूदे कारण तेपण महत्त्वाचे आहेत.

हा लेख कसा वाटला? चार कागद-लिखाणाचा अनुभव कसा वाटला? मला नक्की ई-मेल करून कळवा. मला खूप आवडेल तुमचे अनुभव वाचायला.

तुम्हां सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या खूप खूप शुभेच्छा.

**संपर्क : ujjwala.de@gmail.com**

भाग ८

# गुहेत दडलेले रहस्य

सुहास बारटक्के

‘त्या जुन्या दीपगृहाच्या बेटावरील गुहांमध्ये शिड्या कुणी आणि का बरं बांधल्या असाव्यात?’ या एकाच प्रश्नाने अस्वस्थ होऊन नील व बाबूल यांनी निवतीच्या किनाऱ्यावरील काही बुजुर्ग माणसांकडे हळूच चौकशी सुरू केली. नीलनं इंटरनेटवर देखील शोध घेतला. तेव्हा कळलं की १८६५ ते १८९५ या तीस वर्षांच्या काळात म्हणजे अगदी दीड-दोनशे वर्षांपूर्वी इथं कसलातरी लिलाव व्हायचा. तो कसला? तर पक्ष्यांच्या घरट्यांचा! ही घरटी औषधासाठी उपयोगी असतात म्हणे.. पाकोळी किंवा स्वीफ्ट पक्ष्यांच्या लाळेपासून ही पांढुरकी घरटी गुहेच्या छताला बांधली जातात. त्यात मादी आपली अंडी घालते. टर्न किंवा समुद्र सुरय पक्ष्यांची अंडी गुहेबाहेरच्या जागेत किंवा खालच्या खडकाळ भागात तर स्वीफ्ट किंवा पाकोळी पक्ष्यांची घरटी गुहेच्या आत, वर छतावर. म्हणजे या पक्ष्यांचं खरं तर हे अभयारण्यच तयार झालेलं होतं! इथं कोण येणार होतं लाटांशी सामना करत? आणि जुनं



दीपगृह बंद पडल्यावर तर गेली सुमारे शे-दीडशे वर्षं कुणीच फिरकलं नव्हतं. पण बांधलेल्या शिड्या तर फार जुन्या वाटत नव्हत्या. याचा अर्थ आजही इथं कुणीतरी येत असावेत. कशासाठी? तर पुन्हा या पक्ष्यांच्या घरट्यांची तस्करी करण्यासाठी!' असा अंदाज नील व बाबूलच्या टीमनं बांधला. मग त्यांनी मालवण कुडाळकडे एकदा बसने जाऊन तिथल्या फॉरेस्ट खात्याच्या लोकांकडे विचारणा केली. परंतु त्यांनी हसून खिल्ली उडवत या मुलांची बोळवण केली.

'तिकडे पक्षी वगैरे नाहीत. तिथे कसलीही तस्करी म्हणजे स्मगलिंग वगैरे चालत नाही. तुम्ही घरी जा आणि परत त्या बेटाकडे फिरकू नका. हल्ली तिकडे जायलाही बंदी आहे.' लोक म्हणाले.

निराश होऊन परतलेल्या नील व बाबूल यांनी जिद्द मात्र सोडली नव्हती. त्यांनी आपली चौकशी चालूच ठेवली. रात्री बेरात्री ते घरच्यांना काहीतरी कारण सांगून समुद्रकिनारी फिरायला जायचे. एकदा तर रात्री बारा वाजण्याच्या सुमारास ते दोघं समुद्र किनाऱ्यावर गेले तर चक्क शिट्टी मारल्यासारखा सूंऽऽसूंऽऽ आवाज त्यांना येऊ लागला. त्यांनी त्या आवाजाचा शोध घेतला तेव्हा किनाऱ्यावर असलेल्या सुरूच्या झाडांतून आवाज येत होता. वारा त्या झाडांच्या फांद्यात शिरला की सुरूबनातून सूं सूं असा शिट्टी मारल्याप्रमाणं आवाज यायचा. सुरुवातीला नीलला भितीच वाटली पण नंतर या भयानक वाटणाऱ्या आवाजाचीही त्याला गंमत वाटू लागली.

'सुरूच्या बनात भुताटकी आहे म्हणतात, ती ही भुताटकी होय?' दोघंही सुरूबनातून पुन्हा बाहेर समुद्राच्या वाळूकडे आले तेव्हा त्यांना हसू आवरत नव्हतं. आजूबाजूला सगळीकडे शांत होतं. समुद्राचा गार वारा अंगावर शहारे आणत होता. बाबूलच्या घरीच आज रहायला आला असल्यानं नील तसा निर्धास्त होता. परंतु बाबूलचे बाबा त्यांना शोधायला यायच्या आत त्यांना आता घरी परत जायचं होतं. बारा वाजायच्या आत परत येतो असं बाबूलच्या बाबांना सांगूनच ते घरातून निघाले होते.




वाळूतून घराकडे चालत येत असताना अचानक दोघेही थांबले. 'नील, मला जे दिसतंय ते तुला दिसतंय् का?' बाबूल. ''हो बाबूल, तिकडे सुरूबनाच्या कोपऱ्यावर समुद्राच्या अगदी जवळ दोन काळ्या आकृत्या दिसतायत. नील त्या आकृत्या मानवी असल्या तरी आकाराने मोठ्या आहेत आणि त्या समुद्राच्या पाण्याशी का खेळत असाव्यात?'' बाबूलनं संशय व्यक्त केला.

''काहीतरी गूढ आहे नक्की! भूतं असावीत का, ती?'' नीलनं विचारलं.

''नाही रे भूत वगैरे काही नसतं. घाबरू नकोस.'' बाबूल सांगू लागला तेवढ्यात चमत्कार घडला. अचानक त्या दोन आकृत्यांच्या जवळून प्रकाशाचा एक झोत समुद्रावर टाकला गेला. तीन वेळा त्या प्रकाशात उघडझापड झाली आणि काय आश्चर्य समुद्रातून एक स्पीड बोट अत्यंत वेगाने त्या काळ्या आकृत्यांच्या दिशेनं आली. गुडघाभर पाण्यात उभ्या असलेल्या दोघांना घेऊन ती बोट जुन्या दीपगृहाच्या दिशेनं निघून गेली.

घरी रागावतील, या भितीनं दोघेही बाबूलच्या घराकडे परतले तेव्हा त्यांना खात्री होती की, त्या दोन काळ्या आकृत्या म्हणजे गावातलीच दोन माणसं असावीत. पण त्या दोघांना घेऊन ती बोट कुठे गेली असावी? आणि ती बोट कुठून आली असावी? काय रहस्य असावं रात्री अंधारात हळूच इकडे येऊन त्या व्यक्तींना नेण्याचं? कसली तस्करी चालली आहे निवतीच्या किनाऱ्यावर? कदाचित पुन्हा त्या पक्ष्यांच्या घरट्यांवर डोळा नसेल ना, या तस्करांचा? विदेशात त्या घरट्यांना आजही मागणी आहे म्हणे. एका एका



घरट्याची किंमत काही हजारांत असते. अशी घरटी एकत्र करून परदेशी ग्राहकांना विकण्याचं कारस्थान तर नसेल ना? आणि त्या किनाऱ्यावरच्या व्यक्तींनी बोटीत चढताना एक मोठं बोचकंसुद्‌धा बोटीत ठेवल्याचं बोटीवरच्या दिव्यांच्या प्रकाशात दिसलं होतं.

कसलं बोचकं असावं ते? आणि एवढ्या मध्यरात्री गुपचूप ते काय नेत होते? काहीतरी भयानक प्रकार असावा हे नक्की!

या सगळ्या प्रश्नांचं ओझं डोक्यावर घेऊन नील व बाबूल घरी परतले, ते याचा पाठपुरावा करायचे हे पक्के ठरवूनच.

**संपर्क : ९४२३२९५३२९**

‘किशोर’ हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक हेमंत बाबर यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नं. १ ते १०, ई–१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून ‘बालभारती’, सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्‌ध केले. ※ संपादक – अनुराधा ओक.

'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Hemant Baber, Printed at M/s. Printplus Private Limited, G1 to G10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka-Bhiwandi, Dist-Thane 421311 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004.
* Editor - Anuradha Oak.

# नदी

सचिन शिंदे

नागमोडी नदीमाय वाहे भरून दुथडी
साद घाली पैलतीरा एक लाकडाची होडी

नदी जाते फुलवत काठावरल्या मळ्याला
दिसे शिवार नटून फुटे पाझर तळ्याला

लांब सरकते वाट उंच चढणीचा घाट
पाखरांच्या गुंजनाने जागे बोरबन दाट

गुरे उनाड चरती दूर दिसते कुरण
डोकावते पाण्यामध्ये गर्द बाभळीचे बन

लव्हाळ्यांच्या बेटांवर वाऱ्यासंगे थरथर
ऊन सांडते डोहात मनी हसते दुपार

भर उन्हाच्या प्रहरी एक चुकलेली नाव
काठावर उभे शांत एक हिरवेगार गाव

सांज कलता उशाशी दूर क्षितिज पिवळे
डोहाच्या काठावरती उभे तटस्थ बगळे

नदी वाहे वळणाने दु:ख घेते उदरात
गाव निजले खुशाल दान घेते पदरात

संपर्क : ८४२१५२७५४२

# खरा आनंद

समाधान पुजारी

''अरे पीयूष, तू झोप आता थोडा वेळ. ऑफिस सुटल्यावर मी घरी आले की, तुझा राहिलेला अभ्यास पूर्ण करू आणि आर्या दीदीला त्रास नकोस देऊ. ऐक माझं जरा.'' आई फोनवर पीयूषला समजावत होती.

पीयूष नुकताच दुसरीत जायला लागला होता. सकाळची शाळा असल्यामुळे आर्या, त्याची मोठी बहीण आणि तो दुपारनंतर दोघेच घरी असायचे. आई आणि बाबा दोघेही दिवसभर ऑफिसला असायचे. त्यामुळे त्यांच्या गैरहजेरीत या दोघांचा नुसता गोंधळ चालायचा. मग भांडण झालं की आईला फोन लावायचा आणि तक्रारींचा पाढा म्हणत बसायचं. आईला एकीकडे ऑफिस आणि दुसरीकडे यांची भांडणं, दोन्ही सांभाळायला लागत होतं. तरीही ती त्रासून न जाता; हसत हसत सगळं निभावून न्यायला शिकली होती.

आज पीयूष मोबाईलवर गेम खेळत बसला होता. पण रोज रोज तोच गेम खेळून त्याला बोअर झालं होतं. आता काय करायचं म्हणून त्याने आर्याला त्रास द्यायला सुरुवात केली. त्यात आर्याचा उद्या गणिताचा पेपर असल्यामुळे ती परत परत सगळे फॉर्म्युले घोकत बसली होती. पीयूषच्या त्रासामुळे तिला मन लावून अभ्यास करता येईना. आता आईला फोन करून नको त्रास द्यायला. याला कसं शांत बसवता येईल याचा ती विचार करू लागली.

''पीयूष, तू दुसरा एखादा चांगला, नवीन गेम कर ना डाऊनलोड. माझा राहिलेला अभ्यास पूर्ण झाला की आपण दोघे मिळून खेळू. तोपर्यंत तू एकटा खेळ.'' आर्याने खडा टाकून पाहिला.

पीयूषला ही आयडिया जाम आवडली. आर्या आतून खूश झाली. 'हा बसेल आता गेम खेळत. मी करते अभ्यास.' आर्या दुसऱ्या खोलीत निघून गेली.

पीयूषने गेम शोधायला सुरुवात केली. त्याने एक दोन गेम्स डाऊनलोड करून खेळून बघितल्या पण त्याला त्यातली एकही गेम आवडली नाही. त्याने अजून गेम्स चाळायला सुरुवात केली. एका गेमचं नाव त्याला जरा इंटरेस्टिंग वाटलं.

***The Brave Boy.***

त्याने गेम इन्स्टॉल केली. प्ले बटण दाबलं तसं काही कळायच्या आधी, मोबाईलमधून कुणीतरी त्याला आत ओढून घेतलं. काही काळ काय झालं हे पीयूषला कळलंच नाही. पण आपण आपल्या घरात नाही हे त्याच्या लक्षात आलं. त्याने वर बघितलं तसा त्याला त्याच्या घरातला पंखा दिसला. पण तो खूप लांब होता. पीयूष प्रचंड घाबरला. त्याने आर्यादीदीला आवाज द्यायचा प्रयत्न केला. पण त्याचा लहान आवाज मोबाईलमधून बाहेर पोहोचणं जवळजवळ अशक्य होतं.

आता काय करायचं म्हणून तो विचार करू लागला.





तो पुढे चालू लागला. त्याला थोड्या अंतरावर एक बोर्ड दिसला.

**Level 1**. पीयूषला समजलं की तो गेममध्ये अडकलाय. तो बोर्डच्या जवळ गेला. तिथे गेमचे नियम लिहिले होते. आतमध्ये चार प्लेयर असणार होते. त्यातल्या प्रत्येकाला एक एक खुराडं देण्यात येणार होतं. ग्राऊंडवरती खूप साऱ्या कोंबड्या सोडण्यात आलेल्या होत्या. सगळ्यात जास्त कोंबड्या कोण पकडेल तो दुसऱ्या लेव्हलला जाणार होता.

पीयूष गेटमधून आत गेला. त्याला एक खुराडं देण्यात आलं. पीयूषने बाकीच्या प्लेयरकडे बघितलं तर ते तिन्ही रोबोट होते.

गेम स्टार्ट झाली तसे सगळे जण कोंबड्या पकडायला पळायला लागले. पीयूषपण कोंबड्यांच्या मागे पळू लागला. त्याने एक कोंबडी कशीबशी पकडली तशी तिने त्याच्या हाताला चोच मारली. पीयूष कोंबडी फेकून जोराने 'आई गं' म्हणून ओरडला. पण कोंबड्या पकडल्या तरच आपण पुढच्या लेवलला जाऊ हे त्याला एकदम आठवलं. तसा तो परत कोंबड्यांच्या मागे लागला. कोंबड्या कॉक कॉक करून पुढे पळत होत्या आणि मागून पीयूष.

पीयूषने कशाबशा पाच कोंबड्या पकडल्या आणि गेमची वेळ संपली. पीयूषने सगळ्यात जास्त कोंबड्या पकडल्या होत्या. पीयूष एकदम खूश झाला. त्याने पहिली लेव्हल जिंकली होती.

टिंग टिंग वाजलं आणि तो दुसऱ्या बोर्डजवळ आला. तिथे लिहिलं होतं; **Level 2.**

Level 2 मराठी भाषेबद्दल होती.

तिथे त्याला मराठीत काही वाक्यं देण्यात येणार होती. त्याला ती 'रफ'च्या भाषेत बदलायची होती. तिथे नियम लिहिला होता.

शब्दातील पहिल्या अक्षरानंतर रफ जोडा.

पहिल्या अक्षराला जोडलेला स्वर दुसऱ्या अक्षराला जोडा.

उदा. गेम = गेरफेम.

स्वर म्हणजे नक्की काय असतं ते पीयूषला काही कळलं नाही. तो गेटमधून आत आला. समोर एका बोर्डवर मराठीत काही वाक्यं लिहिली होती.

त्याला ती रफ लावून मोठ्याने वाचायची होती.

पीयूषने मनातल्या मनात एकदा ती वाक्यं वाचून घेतली आणि त्याला हसू आलं. तो मोठ्याने वाचू लागला.



कारफाकूनी करफपाटातून कारफात्री कारफाढून कारफाकांच्या कारफामाचे कोरफोरे करफरकरीत कारफागद करफचाकचा कारफापले. कारफाकूंनी कारफागद कारफापल्याचे करफळताच कारफाका करफळवळले. कारफाकांनीही करफमालच केरफेली. कारफाकांनी कारफाकूंचे कारफाळे कुरफुळकुळीत केरफेस कारफात्रीने करफराकरा कारफापले.

पीयूषने सगळी वाक्यं एकदम बरोबर रफ लावून वाचली होती. परत एकदा टिंग टिंग वाजलं आणि तो तिसऱ्या बोर्डजवळ आला.

बोर्डवर लिहिलं होतं, **Level 3.**

Level 3 ही खूप अवघड होती.

त्याने नियम वाचले.

'या लेव्हलमध्ये तुला एक जादुई दार मिळेल. दार उघडण्यासाठी तुला एक प्रश्न सोडवावा लागेल. बरोबर उत्तर दिलंस, तर तू घरी परतशील. चुकीचं उत्तर दिलंस, तर तू कायमचा गेममध्ये अडकशील!' पीयूष घाबरला. कायमचा अडकणार? मला आर्यादीदी, आई-बाबांकडे जायचंय! त्याने धैर्य गोळा केलं आणि पुढे चालायला सुरुवात केली. समोर एक चमकणारं जादुई दार दिसलं. दारावर मोठा प्रश्न लिहिलेला होताः

'तुझ्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट काय आहे?'

पीयूष विचारात पडला.

खेळणी? गेम? मित्र? पण त्याला आठवलं की त्याला खरंच काय हवं आहे तर ते म्हणजे त्याचं कुटुंब ! त्याने मोठ्याने उत्तर दिलं, ''माझ्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझं कुटुंब! आई, बाबा, आणि आर्यादीदीसोबत असणं!''

दार हळूहळू उघडलं. आतून तेजस्वी प्रकाश बाहेर पडला, आणि पीयूषच्या डोळ्यांसमोर अंधारी आली.

पीयूषने डोळे उघडले तेव्हा तो त्याच्या घरात, त्याच्या खोलीत होता. मोबाईल हातात होता, आणि स्क्रीनवर '**Game Over! You Won!**' असं लिहिलं होतं. पीयूषच्या मनातून एक मोठा भार उतरला. तो घाबरलेला होता, पण आता सुरक्षित होता.



अचानक दार उघडलं, आणि आर्या आत आली. ती पीयूषला घामाघूम आणि घाबरलेला पाहून चकित झाली.

''पीयूष, काय झालं? तू ठीक आहेस ना?'' तिने काळजीने विचारलं.

पीयूषने काही न बोलता आर्याला घट्ट मिठी मारली. त्याच्या डोळ्यांत पाणी आलं.

''आर्यादीदी, मी गेममध्ये अडकलो होतो... ते सारं खूप भयानक होतं! पण मला आता कळलं की तू, आई, बाबा – तुम्ही माझ्यासाठी किती महत्त्वाचे आहात!''

आर्या हसली, पण तिचेही डोळे पाणावले. तिने पीयूषचं डोकं कुरवाळलं आणि म्हणाली,

''अरे मूर्खा, तू काय गेम खेळत होतास? चल, आता गेम बंद! मी माझा अभ्यास संपवला, आता आपण मिळून खेळू पण खरा गेम, मोबाईल नाही! आणि हो, तू मला त्रास दिलास तरी माझं माझ्या छोट्या भावावर खूप प्रेम आहे, ठीक?''

पीयूष हसला.

त्याने मोबाईल बाजूला ठेवला आणि आर्यासोबत लपाछपी खेळायला सुरुवात केली. खोलीत त्यांचं हसणं आणि गोंधळ पुन्हा सुरू झाला. पण या वेळी पीयूषला आयुष्यातील खऱ्या आनंदाची किंमत समजली होती, आणि आता तो हे कधीच विसरणार नव्हता.

**संपर्क : ९९७०७६१९६६**

## ✻ चला चित्र रंगवूया...!!!

स्वातंत्र्यदिनाची तयारी करताना मुलांनी राष्ट्रध्वजाच्या रंगांच्या विविध आकाराच्या पताका तयार केल्या. कागदाची फुले केली. त्यांच्या माळा बांधल्या. चित्र पूर्ण करून छानसे रंगवा.

रेश्मा बर्वे



# AI आणि निवडणूक

भाग ८

अच्युत गोडबोले




राजकारणात टिकायचं असेल तर निवडणुकीमध्ये यश मिळवणं खूप महत्त्वाचं ठरतं. निवडणुकीमध्ये यश मिळवण्यासाठी रणनीती आणि प्रचार सर्वात महत्त्वाचे ठरतात. यासाठी समाजाच्या भावना, लोकांचे कल यांची जाण असणं गरजेचं असतं.

पूर्वीच्या काळी लोकांच्या भावना, त्यांचे विचार यांविषयी जाणून घेणं एक कठीण काम होतं. पण २१व्या शतकात ही गोष्ट तंत्रज्ञानामुळे शक्य होऊ लागली. २००८ मध्ये पहिल्यांदाच अमेरिकेमधल्या अध्यक्षीय निवडणुकांमध्ये सोशल मीडियामधून येणाऱ्या माहितीचा सखोल अभ्यास केला गेला. याचा वापर निवडणुकीत मोलाचा ठरला. पुढच्या काळात निवडणुकांमध्ये रणनीती बनवण्यासाठी AI तंत्रज्ञानाचा वापर केला गेला. वेगवेगळ्या शहरांमध्ये लोकांसाठी असणारे वेगवेगळे कळीचे मुद्दे शोधून काढणं, त्यानुसार निवडणुकांच्या प्रचाराची योजना बनवणं आज AI मुळे शक्य झालं आहे.

निवडणुकीमधल्या AI च्या वापराला एक काळी बाजूही आहे. २०१६ मध्ये झालेल्या अमेरिकेतल्या अध्यक्षीय निवडणुकीमध्ये लोकांच्या भावना हाताळण्यासाठी चक्क AI चा गैरवापर करण्यात आला! या काळात ट्विटरवर लक्षावधी सोशल बॉट्सचा वापर करण्यात आला. सोशल बॉट म्हणजे नेमकं काय? सोशल मीडियावरचं एखादं अकाऊंट जर कुणी व्यक्ती वापरत नसेल आणि ते AI सॉफ्टवेअरद्वारा नियंत्रित होत असेल तर त्याला 'सोशल बॉट' असं म्हणतात.

सोशल बॉट निवडणुकीच्या प्रचारामध्ये अतिशय महत्त्वाचे ठरू शकतात. एखादं ट्विटर अकाऊंट व्यक्ती द्वारा चालवलं जातंय की सोशल बॉटद्वारे चालवलं जातंय हे समजणं खूप कठीण असतं. सोशल

बॉटचं अकाऊंट कुणीतरी व्यक्ती नियंत्रित करत असते आणि ही व्यक्ती शोधून काढणं जवळपास अशक्य असतं. ही व्यक्ती किंवा सोशल बॉट निवडणुकीत नेमका कुणाचा प्रचार करणार?, कुणाला पाठिंबा देणार? हे ठरवत असते. काही सोशल बॉट्स अगदी बेमालूमपणे ट्विट्स करत असतात, तर काही सोशल बॉट्स ती ट्विट्स रिट्विट करत असतात. सामान्य लोकांना कोणतं ट्विट एखाद्या व्यक्तीनं लिहिलेलं आहे आणि कोणतं ट्विट AI तंत्रज्ञानानं बनलेलं आहे ते कळणं अवघड असतं. अशा सोशल बॉट्समुळे सामान्य लोकांची सहज दिशाभूल होऊ शकते. सोशल बॉटनं केलेल्या प्रचाराचा निवडणुकीच्या निकालांवर परिणाम होऊ शकतो. अफवा पसरवणं, खोटा प्रचार करणं हे सोशल बॉटला अतिशय प्रभावीरीत्या जमू शकतं. निवडणुकीमध्ये सोशल बॉटचा वापर ही AI तंत्रज्ञानाची एक काळी बाजू आहे.

लोकांची दिशाभूल करण्यात सोशल बॉटपेक्षाही 'डीप फेक' तंत्रज्ञान जास्त प्रभावी ठरू शकतं. 'डीप फेक' तंत्रज्ञानामध्ये दिशाभूल करणारे ऑडिओज, व्हीडिओज आणि फोटोज बनवले जातात. 'डीप फेक' हा प्रकार AI तंत्रज्ञानावर आधारित आहे. आजच्या जमान्यात डीप फेक ऑडिओ, फोटोज तयार करणं फारसं अवघड नाही. 'अमुक एक राजकारणी आजारी आहे असं दाखवणारा फोटो तयार कर' असं आपण AI सॉफ्टवेअरला सांगितलं तर तो पटकन तशा प्रकारचा फोटो तयार करतो. अशी करामत करणारी सॉफ्टवेअर्स आज इंटरनेटवर सहजरीत्या उपलब्ध आहेत. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे असे डीप फेक व्हिडिओज किंवा फोटोज वणव्यासारखे व्हायरल होतात. मग राजकारणी लोकांना स्पष्टीकरण देताना नाकीनऊ येतात. ब्रिटनमधले मजूर पक्षांचे नेते किएर स्टार्मर यांची अशीच एक ऑडिओ क्लिप २०२३ मध्ये व्हायरल झाली होती. या ऑडिओ क्लिपमध्ये स्टार्मर आपल्या स्टाफवर आरडाओरड करताना ऐकू येत होते. या ऑडिओ क्लिपला ट्विटरवर थोड्या वेळातच अक्षरशः लक्षावधी दर्शकांनी पाहिले.

प्रत्यक्षात राजकारणात AI तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या गोष्टींसाठीही होऊ शकतो. बऱ्याचशा सरकारी प्रक्रिया किचकट आणि वेळखाऊ असतात. त्यामुळे मोठे सरकारी प्रोजेक्ट्स पूर्ण व्हायला जास्त वेळ लागतो. AI तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं बऱ्याचशा सरकारी प्रक्रियांचं ऑटोमेशन करता येणं शक्य आहे. असं झालं तर सरकारी प्रोजेक्ट्स लवकर पूर्ण व्हायला मदत होऊ शकेल. नागरी सेवांमध्ये चॅटबॉट्स वापरायचं ठरवलं तर लोकांना आपल्या प्रश्नांची उत्तरं पटकन मिळत जातील.




निवडणूक व राजकारण लोकांनी AI तंत्रज्ञानाचा गैरवापर करण्याऐवजी चांगला वापर करायचा ठरवलं तर देशाची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ :**

https://www.theguardian.com/technology/2017/may/07/the-great-british-brexit-robbery-hijacked-democracy

https://www.wired.com/story/twitter-bots-democracy-usa-election/

https://www.politico.eu/article/deepfakes-distrust-disinformation-welcome-ai-election-2024/

https://fullfact.org/news/keir-starmer-audio-swearing/

https://www.snowflake.com/trending/use-cases-ai-government/

https://commons.m.wikimedia.org/wiki/File:Urnaelettorale.png public domain.

संपर्क : achyut.godbole@gmail.com

बालभारती

# अभिजात मराठी

मराठी भाषा विभाग
भाषा जनाची | भाषा मनाची

**मराठी अभिजात भाषा झाली, आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी 'बालभारती' आणि महाराष्ट्र शासनाचा 'मराठी भाषा विभाग' मिळून 'अभिजात मराठी' हा उपक्रम राबवत आहे. पुढील विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.**

किशोर मित्रमैत्रिणींनो... आज आपण कवितांचे बोट धरून भाषेचा आनंद घेणार आहोत. विशेष म्हणजे श्रावण महिना आणि मराठी कविता यांचे एक सोनेरी नाते आहे. अगदी श्रावणातल्या उन्हासारखे!

काही निवडक कवींच्या कवितांच्या ओळी फुलपाखरासारख्या माझ्या अवतीभवती आताही विहरत आहेत. बाहेर तर इंद्रधनुष्याच्या पाऊलवाटेवरून आणि रिमझिम त्या पावसाच्या सोबतीने श्रावणराज आपल्याला आनंद देतोच आहे, परंतु श्रेष्ठ कवींच्या कवितेतल्या श्रावण हा भाषेचे सौंदर्य लेऊन कसा आला आहे, तुमच्यासाठी हे बघणे खूप आनंददायी ठरणार आहे. तुम्ही आपल्या गुरुजनांबरोबर, आई-बाबांबरोबर या कविता संपूर्ण स्वरूपात मिळवून हा आनंद नक्की घ्यावा. बालकवी आणि श्रावण यांचे नाते सर्वांनाच माहीत आहे. त्यांच्याच एका कवितेतील श्रावण महिन्याच्या या सुरेख ओळी पहा.

**श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे,**
**क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे,**



केवळ पहिल्या दोन ओळींतूनच बालकवींनी श्रावण महिन्यातील निसर्गरंग चितारला आहे. यात एक वेगळा शब्द तुमचे मन वेधून घेईल. शिरवे हा अगदी वेगळा शब्द! शिरवे म्हणजे काही क्षणच परंतु मुसळधार बरसणारा, ओलावा निर्माण करणारा पाऊस! पुढे श्रावणाचे सप्तरंगी चित्र बालकवींनी केले आहेत. याच कवितेतील दोन अशा ओळी ज्यामुळे डोळ्यांपुढे निसर्गचित्र येते, आणि नवे शब्दसुद्धा तुमच्या भाषेच्या खजिन्यात जमा होतात.

पहा ह्या सुंदर ओळी; हे चित्र मनाच्या पडद्यावर तरळून जाईल.

**बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते,**
**उतरूनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते!**

या ओळींत तुम्हांला आपल्या मराठी भाषेतील सुंदर शब्दांची रत्नपेटीच मिळणार आहे. कुठले बरं ते नवे शब्द? बलाकमाला, कल्पसुम, अवनी, ग्रहगोल! ऊन पावसाच्या या खेळात शुभ्र बगळ्यांची मालिका, म्हणजेच बलाकमाला, उडत येताना असे भासेल की, जणू स्वर्गामधून कल्पवृक्षांच्या फुलांची, म्हणजेच कल्पसुमनांची माळच आपल्या पृथ्वीवर म्हणजेच, अवनीवर एकत्रित येत आहे. जणू काही, अवकाशातून ग्रहगोलच आपल्या पृथ्वीवर उतरत आहेत!

बा. भ. बोरकर हेही आपल्या मराठी भाषेतील एक महत्त्वाचे कवी. त्यांच्या निसर्गकविता अतिशय तरल आहेत. अर्थातच त्यांच्या कवितेतील श्रावण तर पाऊसओल्या सोनेरी उन्हातून फिरण्याचा आनंद तुम्हांला देईल. श्रावणातील ऊन हळद लावून मंगल सोहळ्यासाठी आले आहे असे कवीला वाटते. ते म्हणतात:

**हळद लावूनी आले ऊन, कुंकुमाक्षता फुलांमधून**
**झाडांमधून झडे चौघडा, घुमते पाणी लागून धून!**

पहा, नेहमीचेच ओळखीचे शब्द, पण किती वेगळी किमया करतात ते! श्रावण महिन्यात वृक्ष आणि वेलींवर विविध रंगांची फुले फुलली आहेत. या फुलांमध्ये कवीला कुंकूमाक्षता दिसतात. कल्पना किती चित्रदर्शी, म्हणजे, निसर्गचित्र डोळ्यांसमोर उभी करणारी आहे. पुढे तर आणखीनच गंमत कवी बोरकर यांनी केली आहे वाऱ्यामुळे होणारी झाडांच्या फांद्या नि पानांची सळसळ ही जणू झाडांमधून चौघडा वाजवत आहेत. वाहणारे निर्झर, नद्या, ओहोळ यांचा झुळझुळणारा स्वर जणू काही सनईची धूनच आळवत आहे, असा भास निर्माण होतो आहे. पहा, हळद लावून आलेले ऊन, फुलांच्या कुंकुमाक्षता, झाडांचा चौघडा, नि वाहत्या पाण्याची मंगल धून! आता तुम्ही जेव्हा निसर्गात ह्या कवितेने दिलेली 'दृष्टी' घेऊन पहाल तेव्हा नेहमीचा निसर्ग वेगळा भासेल की नाही? हीच आहे मराठी भाषेची विलक्षण किमया! ही संपूर्ण कविता ग्रंथालयात कविवर्य बोरकर यांच्या' चांदणवेल' संग्रहात तुम्हांला वाचायला मिळेल.

सदानंद रेगे हे मराठीतील आणखी एक प्रसिद्ध कवी. त्यांची 'श्रावण' ही कविता अशीच विलोभनीय आहे. मनाला अतिशय आनंद देणारे हे श्रावणाचे वर्णन वाचून तुम्हीही नक्कीच 'वाह!' असे म्हणाल. कविवर्य सदानंद रेगे यांना श्रावण कसा दिसतो? तर ते म्हणतात...

**आला श्रावण श्रावण, गुच्छ रंगांचे घेऊन**
**ऊन पावसाचे पक्षी आणी ओंजळी मधून!**

हे वर्णन अतिशय सोपे आणि बोलके आहे. श्रावण आपल्याबरोबर येताना काय बरे घेऊन आला आहे? तर, विविध रंगांचे गुच्छ आणि ऊनपावसाचे पक्षी सृष्टी सुंदर करण्यासाठी त्यांनी आणले आहेत. श्रावणात होणारा ऊन-पावसाचा मजेशीर खेळ, नि इंद्रधनुष्याची कमान हे अनोखे चित्र मोजक्या शब्दांत त्यांनी उभे केले आहे.

श्रावण महिन्याच्या सुंदरतेचे वर्णन करणारे कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी लिहिलेले भावगीत आपण कदाचित ऐकले असेल.

**श्रावणात घननिळा बरसला**
**रिमझिम रेशीम धारा!**

कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या ह्या कवितेतून श्रावणाचे संगीतमय वर्णन आहे.

हे गीत भारतरत्न लता मंगेशकर यांच्या स्वरांत असून, शब्दांवर नीट मन एकाग्र करून कवितेतील श्रावणाचा आनंद घ्या! आपल्या अभिजात मराठी भाषेत खरोखर ठायी ठायी सौंदर्य भरले आहे. काही मोजकीच उदाहरणे येथे दिली आहेत. पण उरलेली तुम्ही शोधा. कवी अनिल, इंदिरा संत, शांता शेळके, कुसुमाग्रज, आरती प्रभू अशा अनेक श्रेष्ठ कविवर्यांच्या कविता एक प्रकल्प म्हणून मिळवा, नि कवितेचा समजून आनंद घ्या. आपले आयुष्य सुंदर करण्याची शक्ती असलेली आपली भाषा डोळ्यांच्या ओठांनी पिऊन घ्या आणि समृद्ध व्हा!

**संपर्क : ९८२०३८९४१४**

# शब्दांची उकल

डॉ. नीलिमा गुंडी

''आई, 'गटात न बसणारा शब्द ओळखा' हा प्रकार कठीण आहे गं! तूच बघ! असे शब्द दिले आहेत.

**अ) सुभाषित आ) सुमधुर इ) सुकन्या ई) सुटका**

सगळ्याच शब्दांची सुरुवात 'सु' नं आहे. चार अक्षरी शब्द दोन आहेत. तसंच तीन अक्षरी शब्दही दोन आहेत. काय करू?'' किमयाच्या त्या प्रश्नाला आईने शांतपणे उत्तर दिले, ''अगं, शब्दांची उकल कर!''

हे ऐकून किमया वैतागून म्हणाली, ''आई, तू बाई फार कोड्यात बोलतेस! उकल कर म्हणजे काय?''

यावर आई हसत तिच्याजवळ येऊन बसली नि म्हणाली, ''अगं, मी शिकवते. उकल म्हणजे फोड...आपण पेरू खाताना त्याच्या फोडी करतो ना! तसंच शब्दाचे घटक वेगळे करायचे म्हणजे त्याच्या अर्थाचा पत्ता सापडतो. 'सु' हा शब्दाआधी येणारा उपसर्ग आहे. त्यामुळे चांगला/चांगली/चांगले असा अर्थ येतो शब्दाला! कळलं? मात्र या चार शब्दांपैकी एका शब्दात सु हे अक्षर जरी शब्दात पहिलं असलं, तरी ते स्वतंत्रपणे आलेले नाही. पहिल्या तीन शब्दांमध्ये 'सु' हा चांगले या अर्थी उपसर्ग आहे; पण सुटकामध्ये सु आणि टका अशी त्या शब्दाची उकल होणार नाही. उलट 'सुटका' या शब्दाचा सुटणे या क्रियापदाशी संबंध आहे. हेच इतर शब्दांपेक्षा असलेले त्याचे वेगळेपण त्याला गटात नसलेला शब्द ठरवते!''






हे ऐकताना किमयाचे डोळे आश्चर्याने विस्फारत होते. ती पट्कन म्हणाली, ''आई, म्हणजे शब्दातच अर्थ लपलेला होता की! खरंच! कोडे सुटल्यासारखंच वाटतंय! आई, मला अशी आणखी उदाहरणं घाल ना!''

किमयाला अभ्यासाची गोडी वाटते आहे याचा आनंद होऊन आईने तिला काही गटात न बसणारे शब्द ओळखायला सांगितले. ते असे.

अ) १) प्रभाकर २) प्रशांत ३) प्रगती ४) प्रबल

आ) १) सोमवार २) अनिवार ३) रविवार
४) गुरुवार

इ) १) अहिंसा २) अज्ञान ३) अस्मिता
४) अरुंद

ई) १) जलदेवता २) ग्रामदेवता ३) वायुदेवता
४) अग्निदेवता

आता शब्दाचे घटक वेगळे करून अर्थ शोध बरं! म्हणजे प्रत्येक गटातला गटात न बसणारा शब्द तुला सापडेल.''

किमया बराच वेळ विचार करत होती. शेवटी आईने तिला पाच मिनिटांत उत्तरे मागितली. तिची उत्तरे वाचताना आईला पुन्हा शब्दांची उकल करण्याचे तंत्र तिला समजावून सांगावे लागले. आई म्हणाली, ''अगं, प्रभाकर हा शब्द तू का वेगळा काढलास?'' यावर विजयी स्वरात किमया म्हणाली, ''बाकी तीन शब्द तीन अक्षरी होते. तो एकच शब्द चार अक्षरी होता.'' यावर आई तिला रागावलीच! ती म्हणाली, ''तुझं उत्तर चुकून बरोबर आलं आहे. तुला शब्दाची उकल तर करता आलीच नाही. अगं, इतर शब्दांमध्ये 'प्र' हा उपसर्ग आहे. प्रभाकर या शब्दाची फोड 'प्र' आणि 'भाकर' अशी होत नाही. प्रभा आणि कर असे ते दोन शब्द आहेत. कर म्हणजे किरण; प्रभा म्हणजे तेज... प्रभाकर हे नाव सूर्याचे आहे. माहीत आहे ना? अशी घाई नाही करायची! तू 'आ' गटात अनिवार हा शब्द वेगळा काढला आहेस. ते वाराचे नाव नाही. अनिवार म्हणजे निवारण करता येत नाही, थोपवता येत नाही असा; हा अर्थ कळला का तुला?'' यावर किमयाने मान डोलावली.

आईने पुढचे शब्द तपासले. ''वा! तुला ग्रामदेवता हा शब्द का बरं वेगळा काढावासा वाटला?'' यावर किमया म्हणाली, ''अगं, तू मला पंचमहाभूतांची नावं शिकवली आहेस. बाकीची तीन नावं तशी आहेत. ग्रामदेवता हे काही पंचमहाभूतांशी संबंधित नाही.'' किमयाने खूष होऊन उत्तर दिले. ''पण तुला 'इ' गटाचे उत्तर का नाही आले?'' या आईच्या प्रश्नावर ती म्हणाली, ''अगं आई, सगळेच शब्द विरुद्धाअर्थी शब्द आहेत!'' आई हसून म्हणाली, ''फसली गं आमची किमया! हे बघ अस्मिता हा शब्द काही स्मिताचा विरुद्ध अर्थी शब्द नाही. तू 'अ' या पहिल्या अक्षरामुळे असा चुकीचा समज करून घेतलास. त्या शब्दाची फोड करताना अस्मि आणि ता असे घटक वेगळे होतात. अस्मि हा संस्कृत शब्द आहे. 'अहं अस्मि।' म्हणजे मी आहे. अस्मि म्हणजे आपण स्वतः असणे. अस्मिता म्हणजे आपल्या असण्याची जाणीव किंवा अभिमान. आता कळलं का?'' यावर किमयाने 'हो ऽऽ' म्हणत आईला आनंदाने मिठीच मारली.

किमया लाडात येत आईला म्हणाली, ''आई, तू माझं नाव 'किमया' ठेवलंस. किती छान आहे नाव! किमया म्हणजे जादू. हो ना? मी आता शब्दांचा अर्थ ओळखायची ही उकल करण्याची जादू तुझ्याकडून शिकणारच!''

''छान! किमयाबाई, या आता! आता जरा खेळपण खेळा! खूप डोकं चालवलं ना आज!'' असं म्हणत आईने तिला अंगणात पिटाळलेच!

**संपर्क : ०२०–२४४८६०१५**

# गंमत शब्दांची

प्रा. विश्वास वसेकर
संपर्क : ९९२२५२२६६८



## साखरेची साल काढणे

ज्याला संशयात्मा म्हणता येईल अशा प्रकारचा विचित्र माणूस, जो अकारण संशय घेतो आणि नको तिथे वाद घालत बसतो. साखरेला साल किंवा टरफल असत नाही. तरीही जो माणूस अशा साखरेची साल काढण्याचा प्रयत्न करतो. तो विचित्र आणि चमत्कारीकच म्हटला पाहिजे.

## चवणा

‘चवणा’ या शब्दाला संदर्भानुसार चार-पाच अर्थ लाभलेले आहेत. ‘चवणा’ म्हणजे ‘आवड, गोडी, चटक’. असा एक अर्थ त्या शब्दाला आहे. याउलट ‘व्यसन, वाईट सवय, चाळा’ असाही अर्थ याला आहे. ‘नखरा’ या अर्थाने ‘चवणा’ शब्द अनेकदा वापरला जातो. मिजास करणे, नखरा करणे, हट्ट धरणे या अर्थाने तो अधिक प्रमाणात वापरला जातो. तरीही या सगळ्या अर्थच्छटा त्यातून सूचित होतात.






## आपला हात जगन्नाथ

असे म्हणतात की पुरी येथील श्रीजगन्नाथाच्या मंदिरात देवाचे दर्शन घेऊन झाल्यानंतर तुम्हांला प्रसाद देण्यासाठी म्हणून कोणी माणूस नेमलेला नसतो तिथे तुम्ही तुमच्या हाताने पाहिजे तेवढा प्रसाद वाढून घेऊ शकता. आपल्यासमोर असलेल्या वस्तू किंवा पदार्थांमधून वाटेल तेवढे घेता येणे अशा परिस्थितीत या म्हणीचा वापर करतात.

## पुळका

या शब्दाचा प्रारंभी वापरात असलेला अर्थ ‘रोमांच’ असा आहे. ‘भय, आनंद, वैफल्य इत्यादीमुळे अंगावर आलेला काटा’ असा आहे. नंतर या शब्दाचा अर्थ भिन्न झाला आहे. गेल्या शतकात याला ‘लहर, इच्छा’ असा अर्थ प्राप्त झाला. तर गेल्या पन्नास-साठ वर्षांपासून याचा वापर ‘प्रेमाचा मोठा आवेग, उमाळा, एखाद्याची बाजू घेऊन समर्थन करणे किंवा कड घेणे.’ या अर्थाने केला जाऊ लागला. बोलणे, एखाद्याची बाजू सावरणे या अर्थाने या शब्दाचा वापर झालेला दिसतो.



संस्कृतमधील ‘पुलक’ या शब्दापासून मराठीत हा शब्द निर्माण झाला असे अभ्यासकांचे मत आहे.

# प्रश्नमंजुषा

उदय कदम

१. साताऱ्यात पहिले साहित्य संमेलन कधी भरवले गेले होते ?

१. १९०५ २. १९६२

३. १९९३ ४.१९८०

२. 'अण्णा भाऊ साठे' यांच्या प्रसिद्ध कादंबरीचे नाव ................ हे आहे.

१. आबी २. निखारा

३. माझी मुंबई ४. वारणेचा वाघ

३. खालील म्हण पूर्ण करा.

चांदणे चोराला, ऊन --------

१.पडेल २. कावळ्याला

३. घुबडाला ४. कामाला

४. खालीलपैकी योग्य शब्द ओळखा.

१. तज्ञ २.तज्ज्ञ

३. तज्ञ्ज ४. तत्ज्ञ

५. खालीलपैकी 'साहित्य अकादमीचा बाल साहित्य पुरस्कार २०२५' कोणाला मिळाला आहे ?

१. प्रदीप कोकरे २. सुरेश सावंत

३. शंकर आनी ४. नयना आडारकार

६. मराठी वर्णमालेत मूळ पारंपरिक वर्ण किती आहेत ?

१. ५२ २. ५०

३ . ४८ ४. ४९

७. 'तृतीय रत्न' या नाटकाचे लेखक कोण आहेत ?

१. पु. ल. देशपांडे २. महात्मा फुले

३. विजय तेंडुलकर ४. व. पु. काळे

८. महाराष्ट्रामध्ये पारंपरिक पद्धतीच्या रंगीत लाकडी खेळण्यांसाठी कोणते शहर प्रसिद्ध आहे ?

१. सोलापूर २. कोल्हापूर

३. सावंतवाडी ४. वेंगुर्ला

९. 'अतिशय सुंदर या मराठीची माऊली,
जया बोलती संत सुखे झुलती
तेथील वाणी साक्षात गीता,
तरीही दिसे गोड मराठीचे रूप'
असे मराठीबद्दल कोणी उद्गार काढले आहेत ?

१. संत तुकाराम २. संत ज्ञानेश्वर

३. संत एकनाथ ४. संत नामदेव

१०. अमरावती जिल्ह्यात मराठी भाषा विद्यापीठ कोणत्या ठिकाणी स्थापन करण्यात आले ?

१. अचलपूर २. रिद्धपूर

३. मोझरी ४. वरुड

संपर्क : ९७६७३१३८४३

## प्रश्नमंजुषा जुलै २०२५ ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ – २ | २ – २ | ३ – ३ | ४ – ३ | ५ – ३ |
| ६ – २ | ७ – २ | ८ – ३ | ९ – २ | १० – २ |

# चिमुरडीचे देशप्रेम



आबा महाजन

‘‘आई, ऐक ना, तुला मॉकड्रिल म्हणजे काय असतं, ते माहितीये का?’’ केतकीने शाळेतून घरी आल्याबरोबर आईला प्रश्न विचारायला सुरुवात केली.

‘‘नाही,का ..काय असतं ते?’’



''अगं, मॉक ड्रिल म्हणजे युद्ध सज्जतेची रंगीत तालीम''

''अगं हो बाई, काल परवाच टीव्हीवर हा शब्द ऐकला होता मी. पण विसरले.पण नेमका अर्थ काय ते मात्र पूर्ण मला समजलं नव्हतं.''

''अगं आई, सांगते तुला. आमच्या शाळेत, मॉकड्रिल करण्यात आलं. यात आणीबाणीच्या परिस्थितीच्या वेळी लोकांनी काय करावं हे शिकवलं गेलं, यामुळे आम्हां मुलांना आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित कसं राहावं.. हे शिकवलं गेलं, युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली तर.. लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी काय करावे याचा सराव..आज शाळेत दिला गेला.''

''हो का..? छानच झालं मग. शिकलेलं कधी वाया जात नाही. तुम्हांला प्रात्यक्षिक दिल्यामुळे छान आत्मविश्वास आला असेल ना! अजून काय काय झालं ते सांग ना.''

''अगं, अग्निशमन दलाचे काही कर्मचारी देखील शाळेत आले होते. मग त्यांनी सायरन वाजल्यावर प्रात्यक्षिक करून दाखवली. म्हणजे हा सगळा सराव होता.. तरी देखील अंगावर काटा उभा राहिला.''

केतकी आज शाळेत झालेल्या मॉकड्रिलबद्दल भरभरून बोलत होती, तिला आज खूप साऱ्या नवीन गोष्टी समजल्या होत्या, शिकायला मिळाल्या होत्या. आणि त्यांची रंगीत तालीम देखील झाली होती.

अलीकडे केतकी आठ-दहा दिवसांपासून दररोज वर्तमानपत्र सविस्तरपणे वाचत होती. टीव्हीवरचे कार्टून शो सोडून बातम्या बारकाईने पाहत होती. आपल्या आई-वडलांशी दैनंदिन घडामोडींबद्दल चर्चा करत होती. तेव्हा तिचा लहान भाऊ-साई हादेखील त्यांच्यामध्ये सामील होत होता.

रात्री जेव्हा बाबा घरी आले.. तेव्हा केतकीने सकाळचा शाळेतला सगळा प्रसंग सांगितला. चौथ्या इयत्तेत शिकणाऱ्या आपल्या चिमुरड्या लेकीचा महेशरावांना अभिमान वाटत होता. डायनिंग टेबलवर जेवण करता करता टिव्ही वरच्या बातम्या पाहण्यात सर्व जण गर्क झाले होते. पहलगाम हल्ल्यानंतर देशभरात पाकिस्तान विरोधात संतापाचे वातावरण निर्माण झालं आहे आणि पाकिस्तानवर मोठी कारवाई करण्याची मागणी जनतेकडून होत आहे, याबद्दल टीव्हीवरील अँकर अतिशय आवेशात बोलत होते.

''बाबा, या सगळ्या बातम्यांवरून आपल्या देशात खरोखरच युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे का?''

तेव्हा बाबा म्हणाले, ''खरंच युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यामुळेच आज देशभरात अनेक ठिकाणी मॉक ड्रिल करण्यात आलं, काही ठिकाणी सायरन वाजवून सराव घेण्यात येत आला. काहीतरी नक्की घडेल.''

जेवण करता करता अशी बरीच चर्चा रंगत होती.

रात्रीचा अभ्यास आटोपून.. केतकीने तोफेच्या आकाराची पेटी कपाटातून काढली. आज आईने खाऊसाठी दिलेले पैसे तिने दप्तरातून काढले आणि त्या पेटीत टाकले. गेल्या वर्षभरापासून ती लहान भावाच्या वाढदिवसासाठी पैसे जमा करत होती.. वाढदिवसाला आता फक्त काहीच दिवस बाकी होते. 'त्या पेटीमध्ये आता बऱ्यापैकी पैसे जमा झाले असतील.' असा ती अंदाज करू लागली. त्यानंतर कुणाला काही न कळता गुपचूप ती पेटी कपाटात व्यवस्थित ठेवून ती झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी ती सकाळी लवकरच उठली. आज गुरुवार ८ मे २०२५. आई काहीतरी कामात व्यस्त होती, पप्पा मॉर्निंग वॉकसाठी बाहेर गेले होते. तेवढ्यात पेऽऽ पर असा नेहमीचा आवाज आला. पेपरवाल्याने पेपर फेकला आणि तो निघून गेला. केतकी पेपर आणायला बाहेर गेली. दरवाजा उघडला.

तिने पेपर हातात घेतला व ती हेडलाईन वाचू लागली.. भारतीय लष्कराने बुधवारी पहाटे एक वाजून पाच मिनिटे ते दीड पर्यंत 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाक व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांच्या नऊ ठिकाणांवर लक्षवेधी हल्ले केले.. अशी ती बातमी.

दारातच ती पेपर वाचत उभी होती. तितक्यात आई येऊन, म्हणाली,

''काय झालं गं, केतकी? काय आलंय वर्तमानपत्रात छापून..?''

''आई बघ, बघ ना ... ही बातमी.''

मग आईने देखील पेपर वाचायला सुरुवात केली. आणि म्हणाली,

''अगं केतकी, हा तर अभिमानाचा क्षण आहे.. आपल्या सैन्य दलाने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ग्रेट! खूपच छान कामगिरी! पहलगाममध्ये २६ निरपराध नागरिकांचा बळी दहशतवाद्यांनी घेतला होता, या दहशतवादी हल्ल्याला लष्कराने व हवाई दलाने उत्तर दिले आहे.''

'अगं , बघ ना.. या ऑपरेशनचं  नाव देखील किती छान ठेवलंय ना.. ऑपरेशन सिंदूर! व्वा!''

मग तितक्यात मॉर्निंग वॉक करून बाबा घरी परतले.. आज ते नेहमीपेक्षा लवकरच परतले होते.

आल्या आल्या.. ते म्हणू लागले, ''अगं सविता, केतकी बाळा... लवकर टीव्ही च्या बातम्या लावा..''

मग साई उठला.. त्याने रिमोटचं बटन दाबलं आणि टीव्ही सुरू झाला.

'भारताने दहशतवादाला यशस्वीरित्या प्रत्युत्तर दिलं आहे.. पाकचे हल्ले भारताने हवेतच उधळले. त्यांची ८ क्षेपणास्त्रे ड्रोनने पाडली गेली.' असं सविस्तररित्या बातम्यांमधून सांगितलं जात होतं. पाकिस्तानमधून होत असलेल्या दहशतवादी कारवायांना जशास तसे उत्तर देण्याची ही वेळ आहे. नागरीसुरक्षेसाठी देशभरात केलेल्या मॉकड्रिल या जनतेला संभाव्य धोक्यांची जाणीव करून देणाऱ्या आहेत.. नागरिकांनी सतर्क राहावे.. अशा स्वरूपाच्या बातम्या येऊ लागल्या.. ब्रेकिंग न्यूज सुरू होत्या.

देशातील सर्व जनता हा अभिमानाचा क्षण अनुभवत होती. तितक्यात अंगणात कल्ला ऐकू आला. सर्व जण दारात उंबरठ्याजवळ येऊन थांबले. कॉलनीतले लोक एकत्र जमले होते आणि भारताने पाकिस्तानच्या दहशतवादी ठिकाणावर हल्ले केल्याबद्दल कॉलनीमध्ये फटाके फोडून आनंद व्यक्त करत होते. केतकी, साई फटाक्यांचा आवाज ऐकून पळतच अंगणात गेले.

शाळेची वेळ झाली. मग केतकी शाळेत गेली. मैत्रिणींसोबत आज दिवसभर 'ऑपरेशन सिंदूर' या एकाच विषयावर बोलणं सुरू होतं. मग घरी आल्यावर सेनादलाने केलेल्या कामगिरीच्या बातम्या ऐकत बसली. त्या सगळ्या बातम्या ऐकून केतकी अतिशय



भारावून गेली होती. भारतीय सैन्य दलातील जवानांचे शौर्य बघून तिचेदेखील रक्त सळसळू लागले होते.

आज साईचा वाढदिवस होता. सायंकाळी सेलिब्रेशन होणार होतं. कॉलनीतल्या चिल्यापिल्यांना आमंत्रण दिलं होतं. आईच्या काही मैत्रिणीदेखील येणार होत्या. गावाकडून आजी-आजोबा पण दुपारपर्यंत येणार होते. आजचा दिवस खास होता.

केतकी सकाळी लवकर उठली. तिने शाळेत जाण्याची तयारी केली. ती कपाटाजवळ गेली आणि तोफखान्याच्या आकाराची छोटीशी पेटी तिने दप्तरात ठेवली. आज ती पेटी उघडून त्यात वर्षभर साठवलेल्या पैशांमधून ती भावासाठी काहीतरी सरप्राईज गिफ्ट आणणार होती.

शाळेतदेखील केतकी शांतशांतच बसली होती. कुठल्यातरी गहन विचारात गढली होती. धड मैत्रिणींशीही बोलली नाही. दोन चार जवळच्या मैत्रिणींना एवढीच म्हणाली, की ''सायंकाळी आमच्या घरी या. साईचा वाढदिवस आहे.''

मग शाळा सुटली.

शाळा सुटल्यावर ती फाटकाबाहेर निघाली. सायकल काढून ती सायकलीचे पायडल मारू लागली. परंतु ती ज्या दिशेने जात होती, तिकडं तिचं घर नव्हतंच मुळी.

मग ती कुठे जात होती?

सायकल चालवत ती एका मोठ्या ऑफिसच्या गेटजवळ पोहोचली. एक भव्य दगडी इमारत होती. गेटवर मोठा फलक होता.. त्यावर 'जिल्हाधिकारी कार्यालय' असं मोठ्या अक्षरात लिहिलेलं होतं. तिनं पार्किंग एरियामध्ये सायकल लावली. त्याला कुलूप लावलं आणि आता ती चालू लागली. पाठीवर दप्तर लावले होते. गणवेशातील एक चिमुरडी ह्या ऑफिसमध्ये कशाला आली असेल. म्हणून जो तो तिच्याकडे पाहत होता. बोर्ड वाचत वाचत ती जिल्हाधिकाऱ्यांच्या केबिन जवळ येऊन थांबली. बाहेर पांढराशुभ्र गणवेशात एक शिपाई दिसला. ती त्याच्याजवळ गेली व म्हणाली,

''मला कलेक्टर साहेबांना भेटायचं आहे.'' तो शिपाई खुर्चीवरून उठला व म्हणाला, ''काय काम आहे?''

केतकी म्हणाली, ''भेटायचं आहे, एक महत्त्वाचं काम आहे.''

त्यावर शिपाई म्हणाला, ''त्या तिकडं बाकड्यावर बस. साहेबांची एक तातडीची बैठक सुरू आहे.. थांबावं लागेल तुला.''

''किती वेळ?'' त्यावर शिपाई कसानुसा चेहरा करत म्हणाला, ''सांगता येणार नाही, किती वेळ मीटिंग चालेल ते..! संपली की साहेबांना सांगतो.''

मग केतकी त्या समोरच्या बाकड्यावर जाऊन बसली. आता बराच वेळ झाला होता. आई घरी वाट पाहत असेल.. ती काळजी करेल.. असा विचार ती करू लागली. परंतु आज कलेक्टर साहेबांना भेटणं आवश्यक होतं, म्हणून ती बाकड्यावर बसून राहिली.

येणारे जाणारे केतकीकडे मोठ्या कुतूहलाने पाहू लागले. साधारण दोन तासानंतर मीटिंग संपली. बेल वाजली. बेलचा आवाज ऐकून तो शिपाई तात्काळ उठला व दरवाजा उघडून आत गेला. मग बाहेर आला. मग कुणीतरी एक जण आत गेला. पंधरा मिनिटांच्या अवधीनंतर पुन्हा बेल वाजली. शिपाई पुन्हा उठून आत गेला आणि बाहेर आला. आणि केतकीला म्हणाला ''ए.. मुली, तुला साहेबांनी आत बोलावलंय. जा.''

केतकी उठली. आज ती पहिल्यांदाच कलेक्टर साहेबांना भेटणार होती. दरवाजा उघडून ती आत गेली. केबिनमध्ये मध्यभागी कलेक्टर साहेब बसले होते.. समोरच्या खुर्च्यांवर काही अधिकारी बसले होते. काही पोलीस अधिकारीदेखील तिला दिसले. इतके सगळे अधिकारी एकाच वेळी बघून ती थोडी भांबावली. मग पुन्हा स्वतःला सावरत पुढे गेली. कलेक्टर साहेब तिला पाहताच म्हणाले, ''बोल बेटा, तुझं नाव काय आणि काम काय आहे?.''

तेव्हा केतकीने आपलं नाव सांगितलं आणि पाठीवरची सॅक काढली. तिने सॅक उघडली.. त्यातून एक तोफखान्याच्या आकाराची ती पैशांची पेटी हळूच टेबलावर ठेवली.. आणि म्हणाली

''साहेब, हे घ्या पैसे.''

''पैसे? कशासाठी?

''साहेब, हे सगळे पैसे मी माझ्या लहान भावाच्या

वाढदिवसाला गिफ्ट देण्यासाठी जमवले होते. परंतु ते मी आता सैनिक बांधवांना देण्यासाठी आणले आहे..'' असं म्हणतात उपस्थित सर्व ऑफिसर्स तिच्याकडे मोठ्या कौतुकाने पाहू लागले. केतकीने ती पैशांची पेटी उघडली. त्यातून तिने काही नाणी, नोटा काढल्या व त्या टेबलावर ठेवल्या.. आणि म्हणाली, ''हे पैसे माझ्या आई-बाबांनी, नातेवाईकांनी मला खाऊसाठी दिले होते. ते सगळे पैसे, केलेली बचत मला देश रक्षणासाठी झटणाऱ्या भारतीय सैनिकांसाठी अर्पण करायची आहे.. सैनिक आपल्या देशाचे रात्रंदिवस रक्षण करतात. पाऊस पाणी, वादळवारा.. उन्हातान्हाची अजिबात पर्वा करत नाहीत. कुटुंबापासून, गावापासून लांब राहून देशाचं संरक्षण करतात.. म्हणून त्यांच्यासाठी ही छोटीशी भेट.''

हे सगळं ऐकून कलेक्टर साहेबांचे डोळे पाणावले. तिला जवळ घेत कलेक्टर साहेबांनी तिचं भरभरून कौतुक केलं. तिला एक छानसा बुके भेट दिला. अभिनंदन केलं.पाठीवर शाबासकीची थाप दिली. त्या मीटिंगला जिल्हा माहिती अधिकारीदेखील उपस्थित होते.

कलेक्टरसाहेब उपस्थित अधिकाऱ्यांकडे पाहून बोलू लागले, ''या एवढ्याशा चिमुरडीचे, केतकीचे, या तिच्या देशप्रेमाबद्दल जेवढं कौतुक करावं ना तेवढं कमीच आहे.. मुलांची मनं निरागस, निर्मळ असतात. तिने या माध्यमातून व्यक्त केलेले देशप्रेम मूल्यवान आहे. देशप्रेम व्यक्त करण्यासाठी कुठल्याही बाह्य देखाव्याची, मान-मरातबाची आवश्यकता नसते.. तर फक्त मनामध्ये निर्मळ, निस्वार्थ, निर्व्याज भावना असावी लागते. कर्तव्याची जाण असावी लागते...हे तिने या कृतीमधून सिद्ध केलं आहे..'' सर्व अधिकारी ते ऐकून प्रचंड भारावून गेले होते.

सगळ्यांनी तिच्यासोबत एक छान फोटो घेतला. केतकीने ती रिकामी पेटी पुन्हा आपल्या सॅकमध्ये ठेवली व ती घराकडे निघाली. सायकलीचे पायडल जोरजोरात मारू लागली. आईला केव्हा भेटू आणि तिला हे सगळं केव्हा सांगू, असं तिला झालं होतं.

ती कॉलनीत पोहोचली. कॉलनीतले संदीप डॉक्टर म्हणाले, ''बेटा केतकी, आज फारच छान काम तू केलंस. बघितले ना मी आत्ताच युट्युब वर..'' तेवढ्यात रमा दीदी त्या ठिकाणी आली आणि तिच्याकडे पाहून आनंदाने किंचाळत म्हणाली, ''अगं केतकी, तू चक्क टीव्हीवर झळकली आहेस. फेमस झाली आहेस. अभिनंदन तुझं.काय तुझी डेअरिंग! थेट कलेक्टर ऑफिसला जाऊन भिडलीस तू. तुझ्या कार्याला सलाम. जा लवकर. टीव्ही बघ.''

केतकीला काही कळेना. दारावरची बेल वाजवली. आईने पटकन दरवाजा उघडला. तोच बाबादेखील दरवाजाजवळ येऊन थांबले. आईने तिला डोळे भरून पाहिलं, ''केतकी बाळा..'' असं म्हणत तिला आनंदाने मिठी मारली. पप्पांनादेखील अभिमान वाटत होता. हे त्यांच्या डोळ्यांमधून दिसतच होतं.. खाऊसाठी मिळालेले पैशांमधून तिने कधी खाऊ खाल्ला नाही, ना बाहुली घेतली. ना कधी आईस्क्रीम खाल्लं. तिने छोट्या का असेना, केलेल्या बचतीच्या सदुपयोग केला. त्यामागची तिची प्रांजळ भावना, आणि इतक्या उच्च कोटीचे विचार हे खरंच अमूल्य आहेत. असं त्यांना मनोमन वाटत होतं. आजी आजोबांनी तिच्या पाठीवरून मायेने हात फिरवला.

सायंकाळी वाढदिवस साजरा झाला. येणारा, भेटणारा प्रत्येक जण तिचं कौतुक करत होता. सगळ्यांनीच साईला गिफ्ट दिलं. फक्त केतकी जवळ आता देण्यासाठी काहीच उरलं नव्हतं. ती हिरमुसली झाली. मग तिने ती तोफखान्याच्या आकाराची रिकामी पेटी व बुके साईला भेट दिला. ते गिफ्ट त्याला खूपच भावलं.

तेव्हा साई म्हणाला,

''तायडे, तू खूप ग्रेट आहेस! तुझी ही देशभक्ती आणि देशप्रेम पाहून मी देखील आज निश्चय केला आहे. आणि तो म्हणजे.. मोठेपणी मी देशसेवेसाठी झटणारा सैनिक होईल!

**संपर्क : ९४२३४९२०८८**

# जय जवान जय किसान

प्रकाश सपकाळे

जय जवान जय किसान
आहे एकच आमचा नारा।
भारत देश बनवू महान
आमचा देश आम्हांला प्यारा।।

देशभक्तीचे करीत गुणगान
देशासाठी आम्ही अर्पू प्राण
देशच आमचा जीव की प्राण
सीमरक्षण हा संकल्प, नारा
आमचा देश आम्हांला प्यारा ।।

खूप कष्ट करू धान्य पिकवू
आत्मनिर्भर देशाला बनवू
धनधान्याने संपन्न होऊ
पोट भरूनी तृप्त होवो देश सारा
आमचा देश आम्हांला प्यारा ।।

जवान आणि किसान महान
देशाचे असती ते पंचप्राण
त्यांच्यामुळेच सुख समाधान
शांती, लाभे आपल्या परिवारा
आमचा देश आम्हांला प्यारा ।।

संपर्क : ९७३०२२११५५













# मुखपृष्ठाविषयी

मुखपृष्ठ निर्मिती करताना अपेक्षित विषय, आशय चित्रात येणे अत्यंत महत्त्वाचे असते, जसे 'किशोर' मासिकाच्या ऑगस्ट महिन्याच्या मुखपृष्ठासाठी भारतीय स्वातंत्र्य दिवस हा विषय सर्वप्रथम निश्चित झाला. 'किशोर' मासिक हे विद्यार्थी केंद्रित असल्याने विद्यार्थ्यांच्या दृष्टीने समर्पक मुखपृष्ठ असणे साहजिकच आवश्यक होते. चित्रात स्वातंत्र्यदिनासोबत विद्यार्थी येणे अपेक्षित होते. चित्रनिर्मितीत राष्ट्रभक्ती, राष्ट्राभिमान, राष्ट्रप्रेम, राष्ट्राचे उज्ज्वल भविष्य, राष्ट्रनिर्मितीसाठीचा बालवयातील उत्साह, प्रबळ इच्छाशक्ती आणि त्याकरिता अत्यंत सशक्त मानसिकता असलेले सर्व शालेय विद्यार्थी, अत्यंत सुंदर, आशादायक असा भव्य निसर्ग, उत्तम, प्रभावी, सकारात्मक वातावरण निर्मितीसाठी योग्य प्रकाश योजना या सर्व बाबींचे भान ठेवत मुखपृष्ठ चित्रयोजना केली. सर्वप्रथम चित्रातील आकारांची रचना प्रतीकात्मक पद्धतीने कशी असायला हवी यावर विचार सुरू केला. त्यासोबत सदर चित्रातील मुख्य व्यक्तिरेखा कोण असतील? त्या कशा दिसतील? याचा विचार अंतिम झाल्यावर मुखपृष्ठ चित्राचे स्केच सुरू केले. त्यानंतर या विषयाच्या चित्रनिर्मितीसाठी उत्तम रंगमाध्यम कोणते राहील यावर विचार करूनच कॅनव्हासवर ॲक्रिलिक रंग माध्यमात चित्रनिर्मिती सुरू केली. त्यात मुख्य व्यक्तिरेखा असलेल्या एक लहान मुलगा व मुलगी यांचा चित्रातील वावर कसा असावा यावर विचार केला. आपल्या भारत देशाच्या स्वातंत्र्यदिनाला ते अत्यंत दिमाखामध्ये एकोप्याने तिरंगा फडकवत, मोठ्या विश्वासाने पुढे पावले टाकत जात आहे. हेच विद्यार्थी उद्याचे देशाचे उज्ज्वल भवितव्य व सुजाण नागरिक आहेत. ही या मुखपृष्ठाची संकल्पना ठरवली. त्यानुसार राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम राष्ट्रनिर्मिती या मूल्यांची जाण प्रत्येक बालकांत दिसली पाहिजे. या दृष्टीने ती रेखाटनासोबत रंग व कुंचल्यामधून साकारण्याचा प्रयत्न केला आहे.

किशोरवयीन विद्यार्थ्यांचे राष्ट्रनिर्मिती सोबतच, स्वतःच्या उज्ज्वल भविष्याकडे पडणारे प्रत्येक पाऊल हे त्यांच्या जीवनात येणाऱ्या प्रत्येक दिवसाचे तेजस्वीपणे स्वागत करून यशाचे आकाश पादाक्रांत करतील. या सकारात्मक आविर्भावामध्ये प्रत्येक जण साकारण्याचा प्रयत्न या चित्रातून केला आहे. चित्रलेपन करताना प्रत्येक आकाराचा आभास आणण्यासाठी होग हेअर फॅन ब्रशेश, सिंथेटिक ब्रशेशचा मार्मिक पद्धतीने वापर करण्याचा प्रयत्न मी माझ्या चित्रशैलीत केला आहे.

**राजेश भीमराज सावंत**
कलाध्यापक, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार
**संपर्क : ९९६०९९६२२२**



# परी गं परी

मुबारक शेख

दरी गं दरी
डोंगरातली दरी
मुलांना बाई
हैराण करी

सरी गं सरी
पावसातल्या सरी
बरसतेस कशी
घराघरांवरी

अरी गं अरी
भोवऱ्यातली अरी
फिरतेस किती
गोल गोल तरी

परी गं परी
स्वप्नातली परी
चांदण्यात खुलून
दिसतेस बरी

संपर्क : ९६६५२५७१९१



# पिंपळपार

## व्याख्यानमाला

रत्नाकर धर्माधिकारी

आंबेगाव आता चांगलेच वाढू लागले होते. या नगराला लागूनच एक वसाहत झाली होती. पाठबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्यांची ही निवासस्थाने होती. शिवाय या वसाहतीला लागूनच एक वृद्धाश्रम होता. 'विश्रांती' वृद्धाश्रम. ज्येष्ठ नागरिकांची व्यवस्था तेथे अगदी चोख ठेवली जाई. संस्थेची कीर्ती दूरवर पसरल्यामुळे खूप लांबून लांबून ज्येष्ठ नागरिक येत आणि स्वखुषीने संस्थेत दाखल होत.

क्वार्टर्समध्ये राहणारी मुले बरेचदा वृद्धाश्रमाच्या जवळपास खेळायला जात असत. तेथील मोकळी जागा, सावली देणारे वृक्ष मुलांना खूप आवडत. मग काय- कधी लगोरी तर कधी क्रिकेट रंगत असे. आजोबा-आजीपण बाहेर फेरफटका मारायचा म्हणून वृद्धाश्रमातून तिकडे खेळ बघायला जात असत.

त्या दिवशी मात्र पिंपळाच्या पारावर एकटा अभयच बसला होता. बाकी मुले कुठेतरी सहलीला गेली होती. अभयला एकटाच बसलेला पाहून वृद्ध आजोबा

त्याच्याजवळ आले. पारावर शेजारी बसले आणि अभयची चौकशी करू लागले. अभयचे वडील पाटबंधारे खात्यात इंजिनियर होते आणि सतत फिरतीवर असत. आई जवळच्या दवाखान्यात नर्स होती. अभी बरेचदा घरी एकटाच राहत असे. बाबांनी त्याला एक मोबाईल घेऊन दिला होता. त्यामुळे तो खूपदा मोबाईलवर एकटाच गेम खेळत बसे. लहान वयात त्याला चष्मा लागला होता. डोळ्यांच्या डॉक्टरांनी त्याला 'स्क्रीन टाइम' कमी करायला सांगितले होते. आजोबांना स्क्रीनटाइम हा काय प्रकार आहे ते कळेना. अभयने त्यांना समजावले की, दररोज टी.व्ही., लॅपटॉप आणि मोबाईलवर नजर लावून बसण्यात आपला जो वेळ खर्च होतो त्याला 'स्क्रीन टाइम' म्हणतात.

''आज नं आजोबा, माझे सर्व मित्र सहलीला गेले आहेत. म्हणून मी एकटाच आहे बघा.'' अभय म्हणाला, ''आज मीपण एकटाच आहे. तसा मी नेहमी एकटाच असतो म्हणा...'' आजोबा चक्क डोळे पुसत होते. अभय त्यांच्याजवळ जाऊन त्यांनी धीर देऊ लागला. आजोबा हसले.

''फ्रेंडस?'' अभयने हात पुढे करत विचारले.

''हो.हो. फ्रेंडस!'' आजोबांनी त्याचा हात हातात घेऊन त्याला मैत्रीचे वचन दिले. आता अभयने आजोबांना त्यांचे नाव-गाव-ठाव-ठिकाणा विचारला. त्यांची माहिती ऐकून तो थक्कच झाला! आजोबा एकेकाळी हिंदी सिनेमात खलनायकाचे काम करत असत. त्यांचे पडद्यावरील नाव के. जयवंत होते. हिंदी सिनेमातील सर्व प्रसिद्ध नायकांशी त्यांनी लुटूपुटूची मारामारी केली होती.

अभय उद्गारला, ''तुम्ही चांगल्या लोकांना छळत होता नं, म्हणूनच! म्हणून तुमच्यावर एकटे राहण्याची वेळ आली. तुमच्याच मुलाने तुम्हांला शिक्षा केली.''

''शिक्षा नाही रे बाळा. माझा मुलगा नोकरीकरिता परदेशात गेला आहे. तिथल्या सरकारने परवानगी दिली की तो मलापण तिकडे नेणार आहे! दहा वर्षे झाली अर्ज करून मला. मी आशा सोडून दिली आहे.!''

''अहो आजोबा! तुम्हांला तिकडे अजिबात आवडणार नाही, मी सांगतो. माझ्या काकाने आमच्या आजोबांना तिकडे नेले. पण आजोबा तीन महिन्यांतच कंटाळले आणि परत आले.''

''आपण बरे आणि आपला विश्रांती आश्रम बरा. नाही का?''

''येस, आजोबा... यू आर ए गुडबॉय!'' दोघे हसले. मग आजोबांनी सिनेमाच्या खूप गमतीजमती अभयला सांगितल्या.

''आजोबा! उद्या मी माझ्या सर्व मित्रांना घेऊन येतो. त्यांनापण तुम्ही या गमतीजमती सांगाल?''

''सांगेन की. मला दुसरं काम तरी काय आहे? सांगेन''

''ठरलं तर मग. उद्या या पिंपळाच्या पारावर आजोबांचं व्याख्यान'', ''अहं, एकपात्री प्रयोग म्हणूया आपण माझा! चालेल...?''

मुलांनी वृद्धाश्रमातल्या आजी-आजोबांशी एवढी दोस्ती झाली की, त्यातूनच पुढे एक छान उपक्रम सुरू झाला. आश्रमाचे व्यवस्थापक तरुण आणि कल्पक होते. त्यांनी जेष्ठ नागरिकांनी एक व्याख्यानमालाच सुरू केली. पिंपळपार व्याख्यानमाला! ज्येष्ठ नागरिकांना कुणाशीतरी संवाद हवा होता. मुलांनाही विविध विषयांचे अपरूप होणेच. मग काय! एकेक आजोबा-आजीची व्याख्याने दर रविवारी होऊ लागली. काही जेष्ठांना अध्यक्ष होण्याची हौस होती ती पूर्ण झाली. आळीपाळीने मुलेच वक्त्यांचा परिचय करून देऊ लागली. कोणी आभार मानायची गोऽड कामगिरी पार पाडण्याचा ठेका घेतला. एक आजी तरुणपणी विमान कंपनीत 'हवाईसुंदरी' होत्या. त्या कल्पनेने सर्व श्रोत्यांना सातासमुद्रापार घेऊन गेल्या. एक आजोबा निवृत्त सिव्हिल इंजिनिअर होते. त्यांनी जुना थोर वारसा सांगणारे स्थापत्य समजावून दिले. आधुनिक इमारतींचे फायदेतोटे सांगितले. एक खगोल निरीक्षक होते. त्यांनी मुद्दाम रात्रीच्या अंधारात भाषण दिले. आकाशातील ग्रहताऱ्यांची ओळख करून दिली.

पिंपळपार व्याख्यानमालेमुळे ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्याला आज अर्थ मिळाला. किशोरवयीन मुलामुलींना अतिशय मौल्यवान माहितीचा खजिनाच जणू सापडला.

विश्रांती वृद्धाश्रमप्रमाणेच पिंपळपार व्याख्यानमाला सुद्धा पंचक्रोशीत प्रसिद्ध झाली.

**संपर्क : ९८२१३४९३७०**

वसुंधरा भोपळे

# कुतूहल

संपर्क : ७३८७४३२९४१

'किशोर' मित्रांनो,
'किशोर' जुलै २०२५ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ ऑगस्ट २०२५ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

**१. देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्या. भूषण रामकृष्ण गवई यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात झाला?**
१. अमरावती २. भंडारा
३. चंद्रपूर ४. गडचिरोली

**२. लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी १ ऑगस्ट रोजी असते. याच दिवशी खालीलपैकी कोणाची जयंती साजरी केली जाते?**
१. नामदेव ढसाळ २. बाबुराव बागुल
३. अण्णा भाऊ साठे ४. शंकरराव खरात

**३. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी नुकतेच आसामी भाषेत माहिती देण्यास सक्षम असणाऱ्या भारतातील पहिल्या प्रादेशिक भाषेतील एआय न्यूज अँकरचे अनावरण केले. तिचे नाव काय आहे?**
१. मनवा २. सरिता
३. अंकिता ४. शोभान

**४. भारतीय लेखिका बानू मुश्ताक यांना आंतरराष्ट्रीय बुकर पुरस्कार २०२५ देण्यात आला आहे. त्या खालीलपैकी कोणत्या राज्यातील आहेत?**
१. मेघालय २. त्रिपुरा
३. केरळ ४. कर्नाटक

**५. फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धा २०२५ संदर्भात प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा. कार्लोस अल्कराज : स्पेन : : कोको गॉफ : ?**
१. ऑस्ट्रेलिया २. अमेरिका
३. रशिया ४. जर्मनी

**६. हैदराबाद येथे पार पडलेल्या मिस वर्ल्ड २०२५ स्पर्धेतील विजेती ओपल सुचाता चुआंग्सरी कोणत्या देशाची नागरिक आहे?**
१. चीन २. तैवान
३. थायलंड ४. इंडोनेशिया

**७. जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे नुकतेच अनावरण करण्यात आले. हा पूल खालीलपैकी कोणत्या नदीवर बांधण्यात आला आहे?**
१. सिंधू २. रावी
३. सतलज ४. चिनाब

**८. 'पंजाब किंग्ज'ला हरवून खालीलपैकी कोणत्या क्रिकेट संघाने आयपीएल २०२५ च्या चषकावर आपले नाव कोरले?**
१. चेन्नई सुपर किंग्ज २. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू
३. राजस्थान रॉयल्स ४. मुंबई इंडियन्स

**९. सन २०२५ मध्ये दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक शिक्षण अनिवार्य करणारे पहिले राज्य कोणते आहे?**
१. गुजरात २. केरळ
३. गोवा ४. तामिळनाडू

**१०. ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने कोणत्या आंदोलनाची घोषणा झाली होती?**
१. असहकार आंदोलन
२. सविनय कायदेभंग
३. भारत छोडो आंदोलन
४. खेडा सत्याग्रह

**१० ऑगस्ट १८९३ रोजी ----- या महान शास्त्रज्ञाने आपल्या डिझेल इंजिनमध्ये प्रथमच शेंगदाण्याच्या तेलावर आधारित इंधन वापरले होते. या घटनेच्या स्मरणार्थ 'आंतरराष्ट्रीय जैव इंधन दिवस' साजरा करण्यात येतो.**
१. थॉमस पेट्रोल २.अल्बर्ट आइन्स्टाइन
३. रुडॉल्फ डिझेल ४. हेन्री फोर्ड

१२. आचार्य अत्रे आणि अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मगावासंबंधी खालील प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा. अण्णा भाऊ साठे : वाटेगाव : : आचार्य अत्रे : ?

१. कासेगाव २. सासवड
३. पाचवड ४. पुणे

१३. हॉकीचे जादूगार 'मेजर ध्यानचंद' यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने खालीलपैकी कोणता दिवस 'राष्ट्रीय क्रीडा दिवस' म्हणून साजरा केला जातो?

१. २८ फेब्रुवारी २. २९ ऑगस्ट
३. २८ ऑगस्ट ४. २९ जुलै

१४. 'आंतरराष्ट्रीय हत्ती दिवस' दरवर्षी कोणत्या दिवशी साजरा केला जातो?

१. १२ जून २. १२ ऑगस्ट
३. १५ जुलै ४. ऑक्टोबर

१५. भारताच्या 'चांद्रयान-३' मोहिमेतील ऐतिहासिक यशाचा साक्षीदार म्हणून २३ ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. या मागील मुख्य उद्दिष्ट काय आहे?

१. इस्त्रोच्या संस्थापकांचा सन्मान
२. उपग्रह तंत्रज्ञान प्रसार
३. विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानात प्रेरणा देणे
४. भारत-पाक तांत्रिक स्पर्धा

## जुलै २०२५ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (जुलै २०२५) ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) २ | २) २ | ३) ३ | ४) २ | ५) २ |
| ६) ४ | ७) ३ | ८) ४ | ९) १ | १०) ४ |
| ११) २ | १२) ३ | १३) ३ | १४) १ | १५) १ |

## कुतूहल (जून २०२५) यशस्वी स्पर्धक

**पुणे** – कु. मनस्वी चौधरी
**गोंदिया** – कु. धृवांशी बागडे
**सातारा** – कु. सुवीर फडे

## चित्रकोडे (जून) यशस्वी स्पर्धक

**पुणे** – कु. मनस्वी चौधरी, कु. केयूर मराठे,
**गोंदिया** – कु. धृवांशी बागडे
**बीड** – कु. श्रावणी राऊत
**लातूर** – कु. शौर्य नरहरे
**ठाणे** – कु. अनन्या भेरे
**कोल्हापूर** – कु. उपेंद्र पाटील, कु. आराध्या रावळ, कु. ओंकार रावळ, कु. शांभवी कुलकर्णी
**सातारा** – कु. सुवीर फडे, कु. नानासो सोडमीसे
**इंदूर** – कु. पावनी पैठणकर
**अहिल्यानगर** – कु. प्रज्ज्वल आमले, कु.आराध्या धस, कु. गौरी धस, कु. श्रावणी धस, कु. ओवी गायके, कु. शिवन्या धस, कु.आरोही धस, प्रिया धस, कु. कल्याणी धस, कु. तन्वी धस, कु. स्वरा वाणी, स्वस्तिक वाणी,
**संभाजीनगर** – कु. सायली डोळस



# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



आमच्या शाळेच्या सभोवती नारळाची उंच झाडे आहेत. नारळांचा वापर माध्यान्ह भोजनात केला जातो. नारळ सोलून राहिलेल्या जाड करवंट्यांचा ढीग मैदानावर एका कोपऱ्यात पडून होता.

परिपाठ सुरू होण्यापूर्वी आम्ही सर्व मुले मैदानाची सफाई करत होतो. सफाई करताना माझे लक्ष त्या ढिगाकडे गेले. मुले करवंट्या कचऱ्यात टाकणार इतक्यात मला शेजारच्या आजीची आठवण झाली. आजी चुलीसाठी जळण म्हणून काट्या–कुट्या गोळा करायची. ह्या करवंट्या आजीला दिल्या तर? असा प्रश्न मला पडला व मी सरांना बोलूनही दाखवला. सरांनी लगेच होकार दिला. मी पिशवीतून सर्व करवंट्या घरी आणून आजीला दिल्या. तिला खूप आनंद झाला. आजीने माझे कौतुक केले.

**कु. अद्विका निवास लोखंडे**
इ.पहिली, जि. प.प्राथमिक शाळा, वाडीभाग तडवळे,
ता. शिराळा, जि. सांगली ४१५४०८.



एकदा मी बाबांबरोबर एका मॉलमध्ये गेलो असताना बाबा गाडी पार्क करत होते आणि मी ट्रॉली आणण्यासाठी पुढे गेलो. तेवढ्यात मला दिसले की, बाहेर लावलेले एक मोठे होर्डिंग खालच्या बाजूला वाकले आहे. मी थोडेसे पुढे जाताच ते होर्डिंग पूर्णपणे खाली होऊन पडायच्या बेतात होते. त्या होर्डिंगच्या खाली एक छोटे मूल खेळत होते. मी जोरात ओरडलो की बाजूला हो, वरून होर्डिंग पडतेय खाली. पण त्या छोट्या मुलाला काहीही समजले नाही व त्याच्या आईबाबांचे लक्ष गेले नाही. त्यामुळे मी धावत धावत जाऊन त्या बाळाला बाजूला केले. इतक्यात ते होर्डिंग खाली पडले व त्याचा जोरात आवाज झाला. आवाजामुळे त्या बाळाचे आई बाबा धावत आले व माझे कौतुक केले. माझे बाबा एव्हाना गाडी पार्क करून माझ्याजवळ आले होते व त्यांनी देखील सर्व प्रकार पाहिला होता. बाबांनी मला शाबासकी आणि चॉकलेट दिले. बाळाच्या आई–बाबांनी देखील कौतुकाचा वर्षाव केला व मोठे चॉकलेट बक्षीस म्हणून दिले. बाळ खूश होऊन माझ्याकडे झेप घेत होते. मला दुसऱ्यांना मदत केल्याचे खूप समाधान मिळाले व मी असाच नेहमी लोकांना मदत करत राहीन असा मी मनोमन निश्चय केला.

**कु. कौस्तुभ कुलकर्णी**
बी–५०३, टीसीजी गार्डन, कात्रज, पुणे ४११०४६.



सुट्टीचा दिवस होता. मी आणि माझा मित्र विराज सायकल फिरवत होतो. विराज जोरात पडला. समोरून एस.टी.बस येत होती. मी बस थांबवली. विराजला कडेला बसवले. मी सायकल बाजूला काढली. बस पुढे निघून गेली. माझी सायकल एका बाजूला लावली. त्याची सायकल घेऊन मी त्याला त्याच्या घरी घेऊन गेलो. त्याचे वडील बाहेर उभे होते. त्यांनी सांगितले, विराज सायकलीवरून जोरात पडला. त्यांनी विराजला घरात बसवले. त्याच्या पायांतून रक्त येत होते. त्याच्या आईने ते रक्त पुसले. पट्टी बांधली. विराजचे वडील त्याला दवाखान्यात घेऊन गेले. मी परत घरी आलो. ही घटना मी पहिल्यांदा आईला सांगितली. आईने कौतुक केले. तिने माझ्या वडीलांना सांगितले. माझ्या वडीलांनीदेखील कौतुक केले.

**कु. आयुष दिलीप निंबाळकर**
जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा निंबळक, ता. फलटण, जि. सातारा



आमच्या दारात लिंबाचे झाड आहे. या झाडाखाली माझा छोटा भाऊ आणि मी खेळत असतो. एके दिवशी आम्ही त्या झाडावर पक्ष्यांचे घरटे पाहीले. काही दिवसांनी त्यात अंडी दिसू लागली. आमच्या गल्लीतील एक मुलगा ते घरटे डिवचू लागला. काठीने काहीतरी करत होता. मी त्याला खूप रागवलो आणि त्याला समजावले की, ''पक्ष्यांना डिवचू नकोस व पिल्ले बाहेर आल्यावर सुद्धा त्यांना डिवचू नकोस'' काही दिवसांनंतर अंड्यातून पिल्ले बाहेर आली. मला खूप आनंद झाला.

पिल्लांसाठी काहीतरी करावं म्हणून मी त्या झाडाला वापरलेल्या प्लॅस्टीकच्या बाटल्या कापून त्यात पाणी ठेवण्याची सोय केली. काही दिवसांनी ती पिल्ले व पक्षी उडून गेले. त्यांचा चिवचिवाट मला खूप आनंद देऊन गेला.

**कु. यश नेताजी फराकटे**
माने पार्क, गल्ली नं. २, सरनोबत वाडी, करवीर, जि. कोल्हापूर ४१६००४



सुट्टी होती. मी सकाळी लवकर उठून स्वयंपाक खोलीत गेलो व स्वयंपाक खोलीच्या बाल्कनीमध्ये पाहिले तेव्हा मला मांजर आणि तिची तीन पिल्ले दिसली. ती बाल्कनीच्या एका कोपऱ्यात बसली होती. मांजर आणि मांजराची पिल्ले भुकेने फार व्याकूळ झाली होती.

मला त्यांची फार दया आली. मग मी त्यांना सर्वप्रथम वाटीतून पाणी दिले. पाणी प्याल्यानंतर त्यांना बरं वाटू लागलं. मी परत थोड्या वेळाने त्यांना वाटीतून दूध दिले. पाणी व दूध प्याल्यानंतर ती खूप खूश झाली. थोड्या वेळाने ती झोपी गेली. आम्ही त्यांची खूप काळजी घेलती. नंतर मी खेळायला गेलो. मग मला समजले की ते मांजर आमच्या घराच्या पाठीमागच्या काकूंचे आहे. मग मांजर आणि तिच्या पिल्लांना मी काकूंच्या घरी पोचवले. मला खूप आनंद वाटला.

**कु. विघ्नेश दत्ताराम गावडे, इ.४थी,**
घर नं. ६३८, जांबोटी रोड, शिवाजी नगर, बाचोळी, ता. खानापूर, जि. बेळगाव ५९१३०२.

# उमलती प्रतिभा

## मनीमाऊ

मनीमाऊ, मनीमाऊ,
नेहमीच तुला हवा खाऊ,

बसता उठता गुरगुर
म्याव म्याव सदा सुरू,

गुपचूप गुपचूप घरात येशी,
दही दूध खाऊन जाशी,

मोत्याला पाहून पळून जाशी.
अशी गं कशी, तू वाघाची मावशी?


**कु. रिया राहुल सावंत**
इयत्ता-८ वी, जि. प. प्राथमिक शाळा,
उक्कड गाव (म.)
ता. सोनपेठ, जि. परभणी


## निसर्ग

झाडावर फुलतात
रंगीबेरंगी फुले...
उसाला लागलेत
लांब लांब तुरे...

आकाश होते निळे-निळे
ढग आले काळे काळे...
वारा आला सोऽ सोऽ
पाऊस आला धोऽ धोऽ

पांढऱ्या पांढऱ्या ढगांबरोबर
गोष्टी आम्ही करू...
चमकत्या चांदण्यांबरोबर
मजा आम्ही करू...


**कु. वैदेही उत्तम देसाई**
विद्या मंदिर एरंडपे,
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर




कु. सोहम किशोर दसोरे
श्री संत गजानन महाराज इंग्लीश स्कूल, शेगाव, जि.बुलढाणा-४४४२०३




कु. परी अमोल पवार
जि.प. प्राथमिक शाळा, भाटमरळी, सातारा-४१५००२

# प्रिय झाड

प्रिय झाड,

अरे झाडा, किती दिवसांपासून तुला पत्र लिहीन असा विचार करत होते, आज पत्र लिहायला बसले. अरे तू आम्हांला ऑक्सिजन देतो. आम्ही उलट तुझे रक्षण करण्याऐवजी तुला कापतो. तू आम्हांला फुले, फळे देतो. पण आम्ही तुला काहीच देत नाही. उलट त्रासच देतो.

माझ्या शाळेत पण एक खूप सुंदर गुलमोहराचे झाड आहे. ते झाड मला खूप आवडते. त्या झाडाखाली पण तुझ्यासारखीच सावली असते. तिथे मी आणि माझ्या मैत्रिणी जेवायला बसतो. तिथे मी आणि माझ्या मैत्रिणीच नव्हे तर खूप मुलं मुली जेवायला बसतात.

हे जाऊदे. पण मला हे विचारायचे होते, की लोक जेव्हा तुला कापतात, तेव्हा तुला कसं वाटतं रे? तुला दुखतं का रे? तुला दुखत असलं, तरी मीही काही करू शकत नाही. तू आमच्यासाठी किती काही करतो. आम्ही तुझ्यासाठी एक कामही करू नये. मी आजपासून ठरवलंय की कितीही काही झालं, मी आजारी जरी असले तरी मी तुला पाणी घालणारच. तुला लहानाचं मोठं करणारच.

तू जेव्हा छोटा असतो, तेव्हा लोकं तुझ्याकडं दुर्लक्ष करून तुझ्यावर पाय देतात. तुला किती रे वाईट वाटत असेल? तुला माझ्यासारखे आईवडील आहेत का? तुझ्याशिवाय तर काहीच नाही होऊ शकत. तुझ्याशिवाय जगाची कल्पना करवत नाही. तुझ्याशिवाय ऑक्सिजन नाही. तुझ्याशिवाय पाऊस नाही. तू नाही तर अन्न नाही. तू नाही तर निवारा मिळणार नाही. तरीही तुझी कत्तल होत असते. तुझ्यापेक्षा अधिक ऑक्सिजन कुणाकडे आहे का? तुला त्रास होतो. पण फक्त सांगता येत नाही. इतकंच ना. मी आत्ता पाचवीत. मी मोठी झाल्यावर असा प्रयत्न करील, की तुला पण सांगता येईल, की मला त्रास होतो, तुम्ही मला कापू नका किंवा जाळू ही नका. मग तू आमच्यासोबत बोलू शकशील किंवा खेळू शकशील.

तुला आमच्यासोबत खेळायला आवडेल का? तुला माझ्यासारखे भाऊ-बहीण आहेत का? तुला आमच्यासारखं काम केलं नाही तर आईबाबांची बोलणी बसतात का? तुला लहानाचं-मोठं होण्यासाठी कशाकशाची गरज पडते? तू एक असतो, नंतर तुझे अनेक होतात, त्याला आम्ही जंगल, अरण्य किंवा रान असे म्हणतो. तुला फळं, फुलं किंवा भाज्या येतात. ते आम्ही तोडतो, तेव्हा तुला असं वाटत असेल की आईपासून बाळाला दूर केलं की काय? हो ना. आकाशातून पाऊस पडतो. तो तुझ्या अंगावर पडल्यावर तू ओला होतो का रे? तुला भीती वाटते का रे? तुला कशाची भीती वाटते? का वाटते? तुझं जेव्हा अरण्य होतं तेव्हा तुझ्या शेजारून वाघ, सिंह, बिबट्या किंवा चित्ता इत्यादी प्राणी जातात, तेव्हा तुला भीती वाटते का? इतकंच बोलते आणि थांबते. तुझ्या उत्तरांची मी वाट बघेन.

तुझी सिद्धी

**कु. सिद्धी गणेश तोरकड**

मु.पो.वीरगाव, ता.अकोले, जि.अहिल्यानगर


जादूगाराची सुटका
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
तुमच्या शहरात तुम्हांला सर्व जण ओळखत असतील पण आता आपण जिथे जातोय तिथे तुम्हांला कुणी ओळखेल असं मला तरी नाही वाटत...
तुम्ही केलेल्या गुन्ह्यांत मी अडकायला नको याची मी काळजी घ्यायला नको का?
ठीक आहे. चला लवकर...
कपडे बदलायला जादूगार खोलीत आले आणि कपाट उघडताच त्यांना आरशातून विनय दिसला.
हा मुलगा परत इथे कसा आला... मी अडचणीत आहे ते त्याला कळलं असावं.
मी जादूगाराला दिसलोय आता ते काय करतील.
जादूगाराने मुद्दाम त्या गुंडाला विचारले...
दारा, आपण कुठे चाललोय हे मला जरा सांगशील का?


तुम्हांला कितीदा सांगितले... तेच मी परत परत सांगणार नाही... चला लवकर तयार व्हा.
मी आणि तुम्ही तुमच्याच गाडीतून जाणार आहोत आणि इथे या बंगल्यात तुमच्या बायको-मुलाची काळजी घ्यायला मंगेश थांबणार आहे.
तुम्ही तिकडे काही गडबड केली तर हा मंगेश इथे तुमच्या कुटुंबासोबत काय करेल याचा विचार करा.
हो, मला माझ्या कुटुंबाची काळजी म्हणूनच तर मी तुमचं काम करायला तयार झालो.
चला आता... या कपड्यात मला कुणीही ओळखू शकणार नाही.
छान आहे... पण तो काळा गॉगल काढायचा विचारही करू नका.
ठीक आहे कळलं मला. पण हा गॉगल मला विचित्र दिसतोय.
दिसू द्या. पण त्या मुळेच मी आणि मंगेश सुरक्षित आहे.
बाहेर जाताना जादूगाराने विनयला इशारा केला... व ते दोघेही निघून गेले.
खरंच या जादूगाराने व या लोकांनी काळे गॉगल का घातले असतील?
क्रमशः

# फुलपाखरांची शाळा

स्वप्नील जळगावकर

डोंगराच्या मागे भरे फुलपाखरांची शाळा
त्या शाळेत नाही खडू त्या शाळेत नाही फळा

इथं घोकत बसत नाही कुणीसुद्धा बाराखडी
चुकलं म्हणून देत नाही हातावरती जोरात छडी

ह्या शाळेत फुलपाखरं मस्त मजेत नाचतात
अभ्यास म्हणून आकाशाचं पुस्तक तेवढं वाचतात

फुलांफुलांतले रंग टिपून हत्तीच्या पाठीवर काढतात चित्र
वाऱ्यावरती गिरक्या घेत मित्र पावसाला लिहितात पत्र

इथे नसतात कुणाला तोंडपाठ पाढे शंभर
साऱ्यांचाच येतो तरीही वर्गात पहिला नंबर

डोंगराच्या मागे भरे फुलपाखरांची शाळा
चला मित्रांनो आपणही होऊ तिथे गोळा

संपर्क : ८४८४९२७०७२



# The Heavenly Gift

Sadanand Pundpal

Some clouds were moving in the sky
Trying to settle down on the hills nearby
They brought water from the ocean
Fast blowing wind gave them motion
They looked like dark huge mountains
Ready to jump like furious fountains
They changed the shape now and then
Not following the discipline of the lane
Some of them tumbled and began to cry
Showered water on the land below dry
All birds and animals danced with joy
Like a boy playing with his magic toy
The earth and the trees were lost in mist
Pleased and thanked for the heavenly gift

**Contact : 9404968829**



# The Treasure Hunt

Aaradhya Nandkar
6th class, G.K. Gurukul, Pune

Aditi, Sumeet, and Swaraj were siblings spending their vacation in their hometown. It was a quiet little village not known to many people, yet they found it beautiful—with its vast jungles, fresh waterfalls, cozy little houses, and farms growing every type of crop. The people there were kind and friendly. The three children always looked forward to visiting their village. It was their second night in the village, and the children just couldn't fall asleep. That was because the next day, their parents were taking them on a trek up the big mountains surrounding the village.

"Can you believe it? Tomorrow, for the first time, we're going to explore those beautiful mountains! Think about the animals we'll see!" Aditi said, wide awake even though she was cuddled up in a warm blanket. She loved animals very much.

"I'm thinking about the variety of plants we'll find there!" Sumeet replied. He had a passion for biology. "Just think about the adventure and fun we'll have!" Swaraj added. He was always curious and brave.

Their grandmother, wanting them to sleep early so they wouldn't be tired for the trek, decided to tell them a story.

"Let me tell you a story that will help you fall asleep quickly. And this one is about our very own village. Once upon a time, our village was part of a little kingdom. The king wasn't a wise and just ruler. Instead, he was greedy and cruel. He used to take a huge amount of taxes from the people, which was unfair. "One day, two thieves came into the kingdom. They planned to steal the king's jewels and gold since he had so much of it. One night, they snuck into the castle while everyone was asleep and somehow managed to avoid the guards. They found the room said to be filled with the king's treasures. Being skilled thieves, they managed to open it.

"Inside the room were sparkling rubies, gold coins, silver, and a variety of other precious things. They stole the biggest treasure of all—a large trunk filled with a bit of everything in the room. Somehow, they managed to lift it and ran away.



"Unfortunately for the thieves, someone saw them, and soon they were running for their lives with the trunk. They escaped the soldiers and reached a cave in the mountains. Before falling asleep, like most clever thieves, they hide the treasure in a secret spot. After a while, the soldiers found them, but they couldn't track down the treasure. "The king was furious, even though he still had a lot of treasure left. But his mind was

fixated on that missing chest. Not long after, the kingdom was attacked, the king was killed, and all his treasure was taken away. "But do you want to know the interesting part? It's said that the cave where the chest was hidden is right here in our village."



"Whoa, that's so cool! Why hasn't anyone searched for the treasure?" Swaraj asked, confused.

Grandma replied, "That's because most people think it's just a story. Now, go to sleep. Aditi and Sumeet are already asleep." Saying that, she turned off the light and left the room. But Swaraj just couldn't sleep. His mind was stuck on the chest. Could it really be there? Eventually, he drifted off. The next morning, everyone woke up early and set off toward the mountains. The three children were super excited. They had been waiting for this moment, but now, they also had something else on their minds—the story they had heard the night before.

They had secretly decided to search for the chest, even though they had no clue where it could be and no map to guide them. But Aditi, who was very smart, grabbed a notebook and jotted down everything they knew that might help them find the hidden treasure.

"Well, there's very little we actually know about the treasure," said Sumeet.

"Don't worry, I'm sure we'll find it," said Swaraj confidently.

Meanwhile, Aditi was reviewing her notes when something clicked.

"Wait! The treasure is said to be hidden near caves, and the mountain with seven caves is Saptgufas!"

"Yeah, that's right! Let's ask Mom and Dad to head toward Saptgufas Mountain."

They managed to convince their parents to take the trail toward Saptgufas. It was a long trek, but they eventually reached their destination. Everyone was tired—except the three children. "The treasure is supposed to be in one of the seven caves spread across this huge mountain, and we're only near one of them. It's going to be impossible to find it," said Sumeet. But they didn't lose hope. They searched everywhere around the cave, but the treasure wasn't there. That meant it had to be in one of the other caves. However, everyone was too exhausted to continue. The kids sat inside the cave, disappointed. Suddenly, out of frustration, Swaraj kicked the wall of the cave—and **BAM!**

A large chest fell down with a thud. It was the treasure chest! The thieves had hidden it in a corner high up in the wall, and Swaraj's hard kick had dislodged it!

"Wow! We found the chest!" they all shouted together.

They dragged it out in surprise and showed their family. Soon, the treasure was used for the benefit of the entire village, and the three children were honored as heroes.

**Contact : 9970246417**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Match the correct pairs.** example : Bird = Nest



**Look at the code below and solve the problems.**






चित्रकोडे
रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.
२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२५.
३) कोड्याचे उत्तर सप्टेंबर २०२५ च्या अंकात प्रसिद्ध होईल.
४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal Regd.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.07.2025, Date of Posting - 27th & 28th July 2025 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)






















कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा

लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित 'निवडक किशोर'चे १४ खंड



किंमत प्रत्येकी
₹ १६३ /-
(५०% सूट)






वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ ११४१/-

किशोर


**If not delivered please return to :**

संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग,
पुणे – ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० – २५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,